बियाणं अनेक अस्सल मात्र एक

महामंडळाचं महाबीज

तुमच्या विश्वासाचं बियाणं

त्रैमासिक

# महाबीज वार्ता

वर्ष १७ वे अंक -१ ऑगस्ट २०१९ किंमत पंधरा रुपये



- गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा योजना
- प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY)
- विविध कृषि पुरस्कार
- राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना (अन्नधान्य, कडधान्य, गळीतधान्य व ऊस)

महाबीज®

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला द्वारा प्रकाशित

Registered with Register of News Papers for India under No. RNI Regi. No. MAH/MAR/2000/3351



रायवाडी, जि. लातूर येथे नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पा अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित आत्मा प्रकल्प अधिकारी श्री. जाधव साहेब, उपविभागीय कृषि अधिकारी आळसे साहेब, डॉ. वसंत सुर्यवंशी, सहाय्यक प्राध्यापक, वं.ना.म.कृ.वि. परभणी

वडगाव सिद्धेश्वर, जि. उस्मानाबाद येथे नानाजी देशमुख कृषि संजिवनी योजने अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित श्री.भास्कर कोळेकर उपविभागीय कृषि अधिकारी, महाबीज विभागीय व्यवस्थापक सुरेश गायकवाड, जिल्हा व्यवस्थापक अरूण चव्हाण, महाबीज उस्मानाबाद व शेतकरी बांधव.





मोरवड, जि. लातूर येथे ना.दे.कृ.सं. प्रकल्पा अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा व्यवस्थापक महाबीज लातूर श्री मोराळे व शेतकरी बांधव.




सवना जि. हिंगोली येथे लोक-१ गहू प्रमाणित बियाणे उत्पादन कार्यक्रमाची पाहणी करताना उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा बिज प्रमाणिकरण अधिकारी, जिल्हा व्यवस्थापक महाबीज हिंगोली श्री ठाकरे व शेतकरी बांधव.

सुंदरखेड, जि. बुलढाणा येथे खरीप २०१९-२० हंगामामध्ये सोयाबीन एम.ए.यु.एस.-१५८ वाणाचा पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित जिल्हा व्यवस्थापक व शेतकरी बांधव






गोरेगाव, जि. हिंगोली येथे हरभरा फुले विक्रम बिजोत्पादन क्षेत्राची पाहणी करताना जिल्हा विभागीय बिज प्रमाणिकरण अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, जिल्हा व्यवस्थापक महाबीज हिंगोली श्री ठाकरे व शेतकरी बांधव.

लोथीटोला, जि. गोंदिया येथे खरीप हंगाम २०१९-२० ची पूर्व तयारी कार्यक्रमा अंतर्गत शेतकरी कार्यशाळेत उपस्थित तालुका कृषि अधिकारी एम.ए. वावधने, श्री. एल.एच.मेश्राम विभागीय व्यवस्थापक, जिल्हा व्यवस्थापक महाबीज भंडारा श्री कांबळी व शेतकरी बांधव.







कामठवाडा, जि. यवतमाळ येथे ग्राम बिजोत्पादन कार्यशाळेत उपस्थित विषय विशेषज्ञ श्री नेमाडे साहेब, डॉ. वाणे मॅडम, जिल्हा व्यवस्थापक यवतमाळ, अधिकारी आणि शेतकरी बांधव

उंबर्डा बाजार, ता. कारंजा, जि. वाशिम येथे घेण्यात आलेल्या ग्राम बिजोत्पादन कार्यक्रमा अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमात उपस्थित तालुका कृषि अधिकारी श्री वाळके, डॉ.घावडे जिल्हा व्यवस्थापक, इतर अधिकारीवर्ग व शेतकरी बांधव.



: प्रकाशक :
**व्यवस्थापकीय संचालक**
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, मर्या., अकोला

: संपादक :
**एस.एम. पुंडकर**
महाव्यवस्थापक (उत्पादन) महाबीज, अकोला

**कार्यकारी मंडळ**

- **अध्यक्ष**
  **श्री. अनिल भंडारी** भा.प्र.से.
  व्यवस्थापकीय संचालक
- **कोषाध्यक्ष**
  **संजय ठकरार**
  महाव्यवस्थापक (वित्त)
- **सदस्य**
- **एस.एम. पुंडकर**
  महाव्यवस्थापक (उत्पादन)
- **प्रकाश ताटर**
  महाव्यवस्थापक (प्रभारी विपणन)
- **डॉ.प्रफुल्ल लहाने**
  महाव्यवस्थापक (गुणवत्ता नियंत्रण व प्रभारी-प्रशासन)
- **प्रशांत पागृत**
  महाव्यवस्थापक (प्रभारी-प्र.व अभि.)
- **विनय वर्मा**
  (कंपनी सचिव)

: संपर्क :
**संपादक 'महाबीज वार्ता'**
**महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, मर्यादित**
**महाबीज भवन, कृषी नगर, अकोला - ४४४ १०४**
www.mahabeej.com

**अंकाची किंमत रु. १५/-**
**वार्षिक वर्गणी रु. ५०/- फक्त**

**वर्गणी मनिऑर्डरने अथवा महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ अकोला या नावाने काढलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे स्वीकारली जाते. कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येईल.**

त्रैमासिक


# महाबीज वार्ता

ऑगष्ट - २०१९

वर्ष १७ वे | अंक - पहिला | किंमत पंधरा रुपये

## अंतरंग

- राष्ट्रीय गळीतधान्य व तेलताड अभियान
- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियाना अंतर्गत भरडधान्य (मका) व पौष्टिक तृणधान्य (न्युट्री सिरीयल)
- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम
- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान भात, गहु व कडधान्य कार्यक्रम विविध कृषि पुरस्कार
- राज्या अंतर्गत पीक स्पर्धा योजना
- प्रधानमंत्री पीक विमा योजना
- गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात विमा योजना
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना
- बिरसा मुंडा कृषीक्रांती योजना
- राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) अंतर्गत कोरडवाहु क्षेत्र विकास (RAD)
- पिकांवरील किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप)
- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM, Kisan) योजना



## संपादकीय...

खरीप हंगामामध्ये अत्यल्प प्रमाणामध्ये व उशीरा झालेल्या पावसामुळे खरीप हंगाम व्यवस्थित साधलेला नाही. तरी सुद्धा मोठ्या ऊमेदिने शेतकरी बांधव रब्बी हंगामाच्या पेरणीचे नियोजन मोठ्या प्रमाणात करीत आहेत. महाबीज वार्ताच्या या अंकामध्ये शेतकऱ्यांसाठी उपयोगी असणाऱ्या योजना, अभियान, विकास कार्यक्रम, कृषि पुरस्कार यांची माहिती दिलेली असून, या योजना सुरु असे पर्यंत हा 'महाबीज वार्ता' अंक आपणास अत्यंत मार्गदर्शक म्हणून उपयोगात येईल. शासकीय योजनांची खात्रीशीर माहिती एकत्रित स्वरुपात मिळवण्यासाठी शेतकरी बांधवांना हा अंक महत्वाचा आहे.

विस्तार व प्रशिक्षण विभागाच्या, शेतकरी बांधवांना उपयोगी अशा योजनांची संख्या मुबलक प्रमाणात आहे. राष्ट्रीय गळीत धान्य व तेलताड अभियान, पौष्टिक अन्नधान्य (न्युट्री सिरीयल), राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान, व्यापारी पिके अंतर्गत कापूस कार्यक्रम, राष्ट्रीय अन्नसुरक्षा भात पीक स्पर्धा, व कडधान्य कार्यक्रम, विविध कृषि पुरस्कार, राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजना, प्रधानमंत्री पिक विमा योजना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषीक्रांती योजना, राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) अंतर्गत कोरडवाहू विकास क्षेत्र विकास (RAD) पिकांवरील किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM, Kisan) योजना इत्यादी योजनांचा समावेश आहे. हा अंक नेहमीप्रमाणे शेतकरी बांधवांना उपयुक्त ठरेल अशी खात्री आहे.

या योजना विशेषांकासाठी कृषी आयुक्तालयातील सर्व संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांनी उपयुक्त माहिती उपलब्ध करुन देऊन सहकार्य केले आहे. तसेच कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याचे मार्गदर्शनही लाभले आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी बंधुंनी कृषी विभागाच्या जिल्हा, उपविभाग, तालुका किंवा मंडळ स्तरावरील कार्यालयांकडे संपर्क साधावा.

□ □ □

## विस्तार व प्रशिक्षण विभाग

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत गळीतधान्य व तेलताड अभियान

**अभियानाचा उद्देश** : गळीतधान्य पिके व वृक्षजन्य तेलताड पिकांखालील क्षेत्र वृध्दी व उत्पादकतेत वाढ करणे. या अभियाना अंतर्गत राज्यात १) गळीतधान्य अभियान २) वृक्षजन्य तेलबिया अभियान राबविले जातात.

**अभियान क्र. १ : गळीतधान्य अभियान** : समाविष्ट पिके : सोयाबीन, भुईमूग व करडई

### समाविष्ट जिल्हे

| अ.क्र. | पिके | जिल्हे | जिल्ह्यांचे नाव |
|---|---|---|---|
| १ | सोयाबीन | १४ | अहमदनगर, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, बुलढाणा, अकोला, अमरावती, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपुर |
| २ | भुईमूग | ०४ | नाशिक, धुळे, पुणे, सांगली |
| ३ | करडई | ०४ | अहमदनगर, बीड, उस्मानाबाद, परभणी. |

### योजनेचे स्वरुप :

गळीतधान्य पिकांच्या नवीन विकसीत वाणांचा शेतकऱ्यांमध्ये प्रचार व प्रसारासाठी केंद्र शासनाकडून बियाणे मिनिकिट्सचा पुरवठा करण्यात येतो. मागील १० वर्षातील अधिसूचित पायाभूत/प्रमाणित बीजोत्पादनासाठी अनुदान, मागील १५ वर्षातील अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे अनुदानावर वितरण, विकसीत तंत्रज्ञानावर आधारीत पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन, सुधारीत कृषि अवजारे पाईप्सचा अनुदानावर पुरवठा, फ्लेक्झिफंड घटका अंतर्गत गळीतधान्य पिकांना संरक्षित सिंचन सुविधेसाठी शेततळ्याची निर्मिती, सिंचन जलसाठा उपशासाठी डिझेल पंप वाटप व उत्पादनाची सुरक्षित साठवणूक करण्यासाठी शेतकरी उत्पादन कंपनी/संघ यांना गोदामाचे उभारणीसाठी अनुदानाचा लाभ दिला जातो.

---

# सन २०१८-१९ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंतर्गत भरडधान्य (मका) व पौष्टिक तृणधान्य (न्युट्री सिरीयल)

सन २०१८-१९ पासून केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- भरडधान्य अभियानात बदल करुन राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - भरडधान्य (मका) व राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - पौष्टिक तृणधान्य (न्युट्री सिरीयल) ज्वारी, बाजरी व रागी अशी स्वतंत्र अभियाने सुरु केली असून त्यासाठी स्वतंत्र नियतव्यय निर्धारीत केला आहे.

**योजनेचा उद्देश :**

पौष्टिक तृणधान्य व मका पिकांखालील क्षेत्र विस्ताराद्वारे क्षेत्र व उत्पादकता वाढ, या पिकांच्या नवीन वाणांच्या वापरावर भर देऊन बियाणे/वाण बदलाच्या दरात वृध्दी करणे.

**योजने अंतर्गत समाविष्ट जिल्हे :**

१) रा.अ.सु.अ.-भरडधान्य (मका) - सांगली, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, नाशिक, धुळे व जळगाव (७ जिल्हे).



२) रा.अ.सु.अ.- पौष्टिक तृणधान्य (न्युट्री सिरीयल) - ज्वारी, बाजरी, रागी (एकूण २६ जिल्हे)

| पिक | जिल्हे |
|---|---|
| अ) ज्वारी | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, बीड, जालना, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती व यवतमाळ (एकुण २३ जिल्हे) |
| ब) बाजरी | नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, औरंगाबाद, बीड, जालना व उस्मानाबाद (एकुण ११ जिल्हे) |
| क) रागी | नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर, ठाणे (पालघर सह), रायगड व रत्नागिरी (एकुण ७ जिल्हे) |

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान : व्यापारी पिके अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम

**१. उद्देश**

१) बाराव्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आलेला आहे.

२) कापूस आधारित पीक पध्दतीस चालना देणे.

३) कापूस पिकात एकात्मिक कीड व्यवस्थापनास चालना देणे.

४) कापसाच्या देशी वाणांची अतिघन लागवड पध्दतीचा अवलंब करुन, अधिक लांब धाग्याच्या कापसाच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करुन कापूस उत्पादनास चालना देणे.

**२. समाविष्ट जिल्हे**

१) धुळे २) जळगाव ३) अहमदनगर ४) औरंगाबाद
५) जालना ६) बीड ७) नांदेड ८) परभणी
९) बुलडाणा १०) अकोला ११) वाशिम १२) अमरावती
१३) यवतमाळ १४) वर्धा १५) नागपूर १६) चंद्रपूर

**३. लाभार्थ्यांच्या निवडीचे निकष**

या योजनेअंतर्गत संबंधित जिल्ह्यातील अनुसूचित जाती (किमान १६ टक्के)/अनुसूचित जमाती (किमान ८ टक्के)/यांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करण्यात येते.

तसेच सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या ३० टक्के महिलांची निवड करण्यात येते. जिल्ह्यासाठी प्राप्त होणारा आर्थिक कार्यक्रम राबविताना प्रवर्गनिहाय असलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात येतो.

**४. योंजनेचे स्वरुप**

सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-व्यापारी पिके या अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी केंद्रःराज्य ६०:४० टक्के याप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागविण्यासाठी कापूस पिकांतर्गत अन्नधान्य पिकांचा समावेश करण्यात आला आहे.



**५. योजनेची अंमलबजावणी व घटकनिहाय आर्थिक मापदंड**

१) कापूस पिकात मूग, उडीद आंतरपिकास प्रोत्साहन देणे. (रु. ८०००/- प्रति हे.)

२) कापूस पिकात एकात्मिक कीड व्यवस्थापन (रु.८०००/- प्रति हे.)

३) कापसाच्या देशी वाणांची अतिघन लागवड (HDPS)(रु.१००००/- प्रति हे.)

४) अधिक लांब धाग्याच्या कापूस वाणांच्या बीजोत्पादनाची प्रात्यक्षिके आयोजित करुन कापूस उत्पादनास चालना देणे. (रु.९०००/- प्रति हे.)

५) मनुष्यबळ विकासासाठी राज्यस्तरीय अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण (रु.४००००/- प्रति प्रशिक्षण)

६) ऑनलाइन पेस्ट मॉनिटरींग सर्व्हिसेस (ओपीएमएस) ('क्रॉपसॅप'शी सलग्न) द्वारे कापसावरील कीड व रोगाचे वेळीच नियंत्रण करणे. (रु. ९०.५५/- लाख)

७) स्थानिक गरजेनुरुप घ्यावयाच्या कार्यक्रमास प्रोत्साहन देणे. (कॉटन श्रेडरचे वाटप-अनु. जाती, अनु.जमाती, अल्प व सीमान्तिक शेतकरी, महिला यांच्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के कमाल रु. १.०० लाख प्रति युनिट व इतर लाभार्थ्यांसाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ४० टक्के क्रमाल रु. ०.८० लाख प्रति युनिट)

८) पीक संरक्षण औषधे व बायो एजंट्चे वितरण (रु.५००/-प्रति हे.)

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अन्नधान्य पिके सन २०१९-२० (भात, गहू, कडधान्य)

सन २००७-०८ पासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत भात, गहू व कडधान्य पिकासाठी राबविण्यात येत आहे. सन २०१४-१५ पासून सुधारीत मार्गदर्शक सूचनांनुसार अभियानात भरडधान्य पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे. सन २०१८-१९ पासून या अभियानात पौष्टिक तृणधान्य पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या अभियानासाठी निधीची तरतूद केंद्र व राज्य ६० व ४० टक्के प्रमाणे आहे.

**उद्देश** : क्षेत्र विस्ताराद्वारे उत्पादकता वाढ करणे व उत्पादनात शाश्वत वाढ करणे.

- जमीनीची सुपीकता व उत्पादन क्षमता वाढविणे.
- शेतकऱ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आर्थिक स्तर उंचावणे.

| अ.क्र. | घटक | समाविष्ट जिल्हे |
|---|---|---|
| १ | **राअसुअ - भात** | नाशिक, पुणे, सातारा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली. (८) |
| २ | **राअसुअ - गहू** | बीड, सोलापूर, नागपूर. (३) |
| ३ | **राअसुअ - कडधान्य** | सर्व जिल्हे (३४) |
| ४ | **राअसुअ भरडधान्य- मका** | नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, सांगली, औरंगाबाद, जालना (७) |
| ५ | **राअसुअ- पौष्टिक अन्नधान्य** | ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, बीड, जालना, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती व यवतमाळ. (२६) |

'उन्नत शेती- समृध्द शेतकरी 'मोहीम' राबविण्याबाबत शासन निर्णयानुसार या अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे, यामध्ये तालुका हा घटक निश्चित करण्यात आला असून प्रात्यक्षिके १० हेक्टर क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांच्या गटामार्फत राबविण्यात येत आहेत. यासाठी जमीन आरोग्य पत्रिकेनुसार खतांचा वापर करण्यात येत आहे. तसेच कृषियांत्रिकीकरण या बाबीसाठी जाहिरातीद्वारे इच्छुक लाभार्थ्यांचे अर्ज मागवून लॉटरी पध्दतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात येत आहे. अनुदानाची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) द्वारे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येत आहे.

**योजनेची अंमलबजावणी**

या अभियानाद्वारे पुढील बाबी राबविल्या जात आहेत.

- **राअसुअ भात** - पीक प्रात्यक्षिके, प्रमाणित बियाणे वितरण, एकात्मिक कीड व अन्नद्रव्ये व्यवस्थापन, यांत्रिकीकरण, सिंचन साधने, प्रशिक्षण व स्थानिक पुढाकाराच्या बाबी.
- **राअसुअ गहू** - पीक प्रात्यक्षिके, प्रमाणित बियाणे वितरण, एकात्मिक कीड व अन्नद्रव्ये व्यवस्थापन, यांत्रिकीकरण, सिंचन साधने, प्रशिक्षण व स्थानिक पुढाकाराच्या बाबी.
- **राअसुअ कडधान्य** - पीक प्रात्यक्षिके, बियाणे वितरण व उत्पादन कार्यक्रम, एकात्मिक कीड व अन्नद्रव्ये व्यवस्थापन, यांत्रिकीकरण, सिंचन साधने, प्रशिक्षण व स्थानिक पुढाकाराच्या बाबी.
- **राअसुअ भरडधान्य - मका** - पीक प्रात्यक्षिके, प्रमाणित बियाणे वितरण.
- **राअसुअ पौष्टिक तृणधान्य** - पीक प्रात्यक्षिके, प्रमाणित बियाणे वितरण, एकात्मिक कीड व अन्नद्रव्ये व्यवस्थापन, यांत्रिकीकरण, प्रशिक्षण.

**योजनेची संक्षिप्त माहिती**

**राअसुअ भात**- नाशिक, पुणे, सातारा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली (८ जिल्हे)

राअसुअ भात - नाशिक, पुणे, सातारा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली (८ जिल्हे)

| अ.क्र. | बाब/घटक | अनुदान दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| **१) पीक प्रात्यक्षिके** | | | |
| अ | सुधारीत तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ९००० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक | वि.कृ.स.सं. याचे स्तरावर संलग्न कृषि विद्यापीठाच्या सल्ल्यानुसार जिल्हा/तालुका व पीकनिहाय निर्धारित तंत्रज्ञान पॅकेजनुसार सर्व घटक अंमलबजावणीसाठी, रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे, त्यासाठी अनुदान देय नाही. |
| ब | पीक पध्दतीवर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. १५००० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक | |
| **२) बियाणे वितरण** | | | |
| अ | संकरित बियाणे वितरण (१० वर्षाच्या आतील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. १०००० प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसूचित संकरित वाणांचे प्रमाणित बियाणे |
| ब | अधिक उत्पादन देणारे वाण (१० वर्षाच्या आतील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. २००० प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मागील १० वर्षाचे वरील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे |
| क | अधिक उत्पादन देणारे वाण (१० वर्षाच्या वरील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. १००० प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे |
| **३) अ) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| अ | सूक्ष्म मूलद्रव्ये | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५०० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषिविद्यापीठांच्या शिफारसीनुसार |
| **३) ब) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| १ | पीक संरक्षण औषधे व जैविक घटक | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५०० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार |
| २ | तणनाशके | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५०० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार |
| **४) फ्लेक्झी फंड व कृषिअवजारे** | | | |
| अ | कृषिअवजारे | अनुदान मर्यादा कृषि अभियांत्रिकी उप अभियान प्रमाणे राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू. |

| | | | |
|---|---|---|---|
| ब | प्रभावी सिंचन साधने-पंपसंच | अनुदान मर्यादा कृषि अभियांत्रिकी उप अभियान प्रमाणे राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |
| क | पीकपध्दतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षण | एकूण रु. १४००० प्रति प्रशिक्षण (३५००/सत्र) | ३० शेतकऱ्यासाठी (४ सत्राकरिता) (२ सत्र खरीप मध्ये व २ सत्र रब्बी मध्ये |
| ड | स्थानिक पुढाकाराच्या बाबी | | |
| i) | FPO करिता गोदाम बांधकाम | खर्चाच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १२.५० लाख प्रति पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |
| ii) | शेतकरी गटाकरिता मिनी राईस मिल | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. २.०० लाख प्रति पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |
| iii) | स्थानिक वाणाची लागवड प्रात्यक्षिक | उच्चतम मर्यादा रु. ४५०० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक | स्थानिक वाणांच्या गुणवैशिष्ट्यांमुळे प्रसिध्द व चांगला भाव मिळणाऱ्या अशा वाणांची कृषी विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्राच्या सहाय्याने प्रात्यक्षिके व प्राथमिक प्रक्रिया व पॅकिंग |
| iv) | भात शेतीत मत्स्यपालन | उच्चतम मर्यादा रु. २५००० प्रति एकर अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/छोटे शेतकरी यांच्यासाठी आणि रु. २०००० प्रति एकर इतर शेतकऱ्यांसाठी | यासाठी मत्स्यपालन विकास विभागाचे मार्गदर्शन घ्यावे. |

**राअसुअ गहू - सोलापूर, बीड, नागपूर (३ जिल्हे)**

| अ.क्र. | बाब/घटक | अनुदान दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| **१) पीक प्रात्यक्षिके** | | | |
| अ | सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ९००० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक | वि.कृ.स.सं. याचे स्तरावर संलग्न कृषि विद्यापीठाच्या सल्ल्यानुसार जिल्हा/तालुकानिहाय व पीकनिहाय निर्धारित तंत्रज्ञान पॅकेजनुसार सर्व घटक अंमलबजावणीसाठी, रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे, त्यासाठी अनुदान देय नाही. |
| ब | पीक पध्दतीवर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. १५००० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक | |
| **२) बियाणे वितरण** | | | |
| अ | अधिक उत्पादन देणारे वाण बियाणे वितरण (१० वर्षाच्या आतील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. २००० प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसूचित संकरित वाणांचे प्रमाणित बियाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ब | अधिक उत्पादन देणारे वाण (१० वर्षाच्या वरील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. १००० प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे |
| **३) अ) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| अ | सूक्ष्म मूलद्रव्ये | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५०० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषिविद्यापीठांच्या शिफारसीनुसार |
| **३) ब) एकात्मिक कीड व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| १ | पीक संरक्षण औषधे व जैविक घटक | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५०० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार |
| २ | तणनाशके | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५०० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार |
| **४) फ्लेक्झी फंड व कृषिअवजारे** | | | |
| अ | कृषि अवजारे | अनुदान मर्यादा कृषि अभियांत्रिकी उप अभियान प्रमाणे राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |
| ब | प्रभावी सिंचन साधने | | |
| i) | पंप संच | अनुदान मर्यादा कृषि अभियांत्रिकी उप अभियान प्रमाणे राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |
| ii) | सिंचन सुविधेकरिता-पाईप | HDPE- किंमतीच्या ५० टक्के रु. ५० प्रति मीटर मर्यादेत, PVC- किंमतीच्या ५० टक्के रु. ३५/- प्रति मीटर मर्यादेत, HDPE Laminated Woven Lay Flat Tubes - किंमतीच्या ५० टक्के रु. २०/- प्रति मीटर मर्यादेत | एका शेतकऱ्याला रु. १५००० मर्यादेतच अनुदान देय राहील. |
| क | पीकपध्दतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षण | एकूण रु. १४००० प्रति प्रशिक्षण (३५००/सत्र) | ३० शेतकऱ्यासाठी (४ सत्राकरिता) (२ सत्र खरीप मध्ये व २ सत्र रब्बी मध्ये |
| ड | स्थानिक पुढाकाराच्या बाबी | | |
| i) | FPO करिता गोदाम बांधकाम | खर्चाच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १२.५० लाख प्रति पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |

राअसुअ कडधान्य – सर्व जिल्हे

| अ.क्र. | बाब/घटक | अनुदान दर | अनुदान पात्रतेचे निकष |
|---|---|---|---|
| **१) पीक प्रात्यक्षिके** | | | |
| अ | सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ९००० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक | वि.कृ.स.सं. याचे स्तरावर संलग्न कृषि विद्यापीठाच्या सल्ल्यानुसार जिल्हा/तालुकानिहाय व पीकनिहाय निर्धारित तंत्रज्ञान पॅकेजनुसार सर्व घटक अंमलबजावणीसाठी, रासायनिक खतावरील खर्च लाभार्थी शेतकऱ्याने स्वतः करावयाचा आहे, यासाठी अनुदान देय नाही. |
| ब | आंतरपीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. ९००० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक | |
| क | पीक पध्दतीवर आधारित पीक प्रात्यक्षिके | उच्चतम मर्यादा रु. १५००० प्रति हेक्टर प्रति प्रात्यक्षिक | |
| **२) बियाणे वितरण** | | | |
| अ | बियाणे वितरण – अधिक उत्पादन देणारे वाण (१० वर्षाच्या आतील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. १०००० प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसूचित संकरित वाणांचे प्रमाणित बियाणे |
| ब | बियाणे वितरण – अधिक उत्पादन देणारे वाण (१० वर्षाच्या वरील बियाणे) | किंमतीच्या ५० टक्के किंवा रु. २५०० प्रति क्विंटल यापैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मागील १० वर्षाचे वरील राज्यासाठी अधिसूचित संकरित वाणांचे प्रमाणित बियाणे |
| क | बियाणे उत्पादनास अर्थसहाय्य – (१० वर्षाच्या आतील बियाणे) | रु. ५००० प्रति क्विंटल | मागील १० वर्षाचे आतील राज्यासाठी अधिसूचित सुधारित वाणांचे प्रमाणित बियाणे |
| **३) अ) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| i) | सूक्ष्म मूलद्रव्ये | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५०० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषि विद्यापीठांच्या शिफारसीनुसार |
| ii) | जिप्सम | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ७५० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषि विद्यापीठांच्या शिफारसीनुसार |
| iii) | जैविक खते | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ३०० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | मृद आरोग्य पत्रिका व कृषि विद्यापीठांच्या शिफारसीनुसार |
| **३) ब) एकात्मिक कीड व्यवस्थापन (आय.एन.एम.)** | | | |
| i) | पीक संरक्षण औषधे व जैविक घटक | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५०० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार |

| | | | |
|---|---|---|---|
| ii) | तणनाशके | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. ५०० प्रति हेक्टर पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | केंद्रीय कीटकनाशक मंडळाच्या लेबल क्लेम व कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार |
| **४) फ्लेक्झी फंड व कृषि अवजारे** | | | |
| अ | कृषि अवजारे | अनुदान मर्यादा कृषि अभियांत्रिकी उप अभियान प्रमाणे राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |
| ब | प्रभावी सिंचन साधने | | |
| i) | सिंचन सुविधेकरिता-पाईप | HDPE- किंमतीच्या ५० टक्के रु. ५० प्रति मीटर मर्यादेत, PVC- किंमतीच्या ५० टक्के रु. ३५/- प्रति मीटर मर्यादेत, HDPE Laminated Woven Lay Flat Tubes - किंमतीच्या ५० टक्के रु. २०/- प्रति मीटर मर्यादेत | एका शेतकऱ्याला रु. १५००० मर्यादेतच अनुदान देय राहील. |
| ii) | पंपसंच | अनुदान मर्यादा कृषि अभियांत्रिकी उप अभियान प्रमाणे राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |
| क | पीकपध्दतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षण | एकूण रु. १४००० प्रति प्रशिक्षण (३५००/सत्र) | ३० शेतकऱ्यासाठी (४ सत्राकरिता) (२ सत्र खरीप मध्ये व २ सत्र रब्बी मध्ये |
| ड | प्रकल्प व्यवस्थापन चमू | -- | राज्यस्तर व जिल्हास्तर (तंत्र सल्लागार व तंत्र सहाय्यक) |
| इ | स्थानिक पुढाकाराच्या बाबी | | |
| i) | शेतकरी गटाकरिता मिनी डाळ मिल | किंमतीच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १.२५ लाख प्रति पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |
| ii) | FPO करिता गोदाम बांधकाम | खर्चाच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १२.५० लाख प्रति पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |
| iii) | FPO करिता बीजप्रक्रिया संच | खर्चाच्या ५० टक्के किंवा उच्चतम रु. १०.०० लाख प्रति पैकी किमान प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. | थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) कार्यप्रणाली लागू |

# विविध कृषी पुरस्कार

दरवर्षी राज्यात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकरी, महिला शेतकरी, कृषी पत्रकार, गट तसेच संस्था यांना विविध पुरस्काराने गौरविण्यात येते. या पुरस्कारांकरीता प्रस्ताव सादर करणेबाबत कार्यपध्दती आणि मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे आहेत.

**१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार**

डॉ.पंजाबराव देशमुख यांनी कृषीक्षेत्रात केलेल्या कार्याला अभिवादन म्हणुन त्यांच्या १०१ व्या जयंतीचे निमित्त साधुन सन २००० पासून राज्यातील कृषीक्षेत्रात अतिउल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्ति किंवा संस्थेस डॉ.पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार देण्यात येत आहे. डॉ.पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार हा राज्याच्या कृषी विभागामार्फत दिला जाणारा सर्वोच्च पुरस्कार आहे. या पुरस्कारासाठी निवड होणाऱ्या व्यक्ति/गट/संस्थेस रु.७५,०००/- रोख रकमेचे पारितोषिक, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

**निकष**

१) हा सर्वोच्च पुरस्कार दरवर्षी फक्त एकाच व्यक्ती/गट/संस्थेस देण्यात येतो. त्या अनुषंगाने व्यक्ती/गट/संस्था यांचे कार्य अतिउल्लेखनिय असावे.

२) सर्वसाधारणपणे मागील २०-२५ वर्षामध्ये शेतीचा अनुभव असलेल्या व्यक्ती/गट संस्थेला प्राधान्य दिले जाते.

३) व्यक्ती/गट/संस्थेचे कृषि उत्पादन, कृषी विस्तार, निर्यात, कृषि प्रक्रिया, पीक फेरबदल, कृषी उत्पादन वाढीसाठी वापरलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान, त्यामधील त्यांचे कार्य तसेच समाजातील स्थान बाबत सर्वंकष विचार केला जातो.

४) कोरडवाहू क्षेत्रातील कार्य आणि कोरडवाहू तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर करणे आवश्यक.

५) सदर पुरस्कारार्थीच्या शेतीतील नाविन्यपूर्ण उपक्रमांचा इतर शेतकऱ्यांना होणारा फायदा.

६) कृषि विपणन, प्रक्रिया, काढणीपश्चात तंत्रज्ञानाचा अवलंब तसेच याबाबतचे कार्य इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शक असावे.

७) कृषि क्षेत्रातील कार्य संघटनात्मक आणि संपूर्ण राज्याला दिशादर्शक असावे.

८) शासकीय किंवा शासन अंगीकृत व सहकार संस्था यांच्या आस्थापनेवर काम करणारे किंवा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत. तसेच केंद्र किंवा राज्य शासनाकडून किंवा अंगीकृत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी व्यक्ति/संस्था पात्र असणार नाहीत.

९) शासनाकडून यापुर्वी दिलेल्या पुरस्काराला किमान ५ वर्षे पेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला असावा.

१०) प्रस्तावित शेतकरी गट/संस्था शेतकरी मासिकाचे सभासद असावेत.

११) प्रस्तावित शेतकरी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या स्वाक्षरीचा चारित्र्याचा दाखला मूळ प्रतीतच सादर करणे आवश्यक आहे.

१२) प्रस्तावित शेतकरी शासन किंवा शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसल्याबाबत रु. १००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्र देण्यात यावे.

१३) प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये ७/१२, ८-अ, मुळप्रतीत जोडणे अनिवार्य राहील. अपवादात्मक स्थितीत संस्था किंवा गट यांचे बाबतीत ७/१२, ८-अ ऐच्छिक राहिल.

**२) वसंतराव नाईक कृषीभुषण पुरस्कार**

कृषी संचालनालयाच्या स्थापनेस १०० वर्षे पुर्ण झाल्याच्या स्मरणार्थ सन १९८४ सालापासून कृषी व फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय आणि सहकार व ग्रामिण विकास या क्षेत्रात अतिउत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्ती/संस्थेस वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार देण्यात येत आहे. सध्या या पुरस्कारांची संख्या १० आहे. प्रत्येक पुरस्कारार्थीला रु. ५०,०००/- रोख रकमेचे पारितोषिक, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र आणि सपत्निक सत्कार असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

**निकष**

१) कृषी क्षेत्रात संघटनात्मक कार्य करणारे शेतकरी/गट/संस्था असावेत आणि त्यांचे कार्य संपुर्ण राज्याला दिशादर्शक असावे.

२) प्रस्तावित शेतकरी हा 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी' पुरस्कार प्राप्त शेतकरी असावा.

३) शासनाकडून यापूर्वी दिलेल्या पुरस्काराला किमान ५ वर्षे पेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला असावा.

४) शासकीय किंवा शासन अंगीकृत व सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर काम करणारे किंवा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत. तसेच केंद्र किंवा राज्य शासनाकडून किंवा अंगीकृत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी व्यक्ति/गट/संस्था पात्र असणार नाही.

५) प्रस्तावित शेतकरी/गट/संस्था शेतकरी मासिकाचे सभासद असावेत.

६) प्रस्तावित शेतकरी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या स्वाक्षरीचा चारित्र्याचा दाखला मूळ प्रतीतच सादर करणे आवश्यक आहे.

७) प्रस्तावित शेतकरी शासन किंवा शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसल्याबाबत रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्र देण्यात यावे.

८) प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये ७/१२, ८-अ मुळप्रतीत जोडणे अनिवार्य राहील अपवादात्मक स्थितीत संस्था किंवा गट यांचे बाबतीत ७/१२, ८-अ ऐच्छिक राहिल.

**३) जिजामाता कृषीभूषण पुरस्कार**

राज्यातील शेती क्षेत्राची सातत्याने होत असलेली प्रगती व या प्रगतीत उत्पादनवाढीत महिलांचाही फार मोठा वाटा आहे व तो सातत्याने वाढत असून शेती, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक चळवळीत महिला सातत्याने पुढे येत आहेत. शेती विकासाच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची बाब तसेच शेती क्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव व्हावा व अशा महिलांच्या कार्याने प्रभावित होऊन इतर महिलांमध्ये जागृती निर्माण होण्याच्या उद्देशाने कृषी क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला शेतकऱ्यांना सन १९९५ पासून जिजामाता कृषीभुषण पुरस्कार देण्यात येतो. राज्यातुन दरवर्षी पाच (५) महिला शेतकऱ्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. पुरस्कारार्थी महिलांना प्रत्येकी रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार) रोख आणि स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र व पतीसह सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

**निकष**

१) कृषी क्षेत्रात संघटनात्मक कार्य करणाऱ्या महिला शेतकरी असाव्यात आणि त्यांचे कार्य संपुर्ण राज्याला दिशादर्शक असावे.

२) प्रस्तावित महिला शेतकरीही 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी' पुरस्कार प्राप्त शेतकरी असावी.

३) शासनाकडून यापुर्वी दिलेल्या पुरस्काराला किमान ५ वर्षे पेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला असावा.

४) शासकीय किंवा शासन अंगीकृत व सहकार संस्था यांच्या आस्थापनेवर काम करणारे किंवा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत. तसेच केंद्र किंवा राज्य शासनाकडून किंवा अंगीकृत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी व्यक्ति/संस्था पात्र असणार नाही.

५) प्रस्तावित महिला शेतकरी ही शेतकरी मासिकाची सभासद असावी.

६) प्रस्तावित महिला शेतकरी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या स्वाक्षरीचा चारित्र्याचा दाखला मूळ प्रतीत सादर करणे आवश्यक आहे.

७) प्रस्तावित महिला शेतकरी शासन किंवा शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसल्याबाबत रु. १००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्र देण्यात यावे.

८) प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये ७/१२, ८-अ, मुळप्रतीत जोडणे अनिवार्य राहिल.

**४) वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार**

पत्रकारीतेद्वारे किंवा इतर अन्य मार्गाने कृषी क्षेत्रात विस्तार आणि मार्गदर्शनाबाबत बहुमोल कामगिरी करणारे शेतकरी/व्यक्ती/संस्था त्याचप्रमाणे कृषी क्षेत्राशी संलग्न घरगुती उद्योग उदा. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मधुमक्षिकापालन, रेशीम उद्योग, गांडुळशेती इत्यादीमधील वैशिष्टपुर्ण कामगिरी करणाऱ्या व्यक्ती तसेच खेड्यांमधुन परसबाग वृध्दींगत करणाऱ्या महिला इत्यादींना राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत सन १९९४ पासून वसंतराव नाईक शेतीमित्र हा बहुमान प्रदान करुन सन्मानित करण्यात येते. रु. ३०,०००/- रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

**निकष**

१) कृषी क्षेत्रातील कार्य संघटनात्मक आणि संपूर्ण राज्याला दिशादर्शक असावे.

२) शासकीय किंवा शासन अंगीकृत व सहकार संस्था यांच्या आस्थापनेवर काम करणारे किंवा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत. तसेच केंद्र किंवा राज्य शासनाकडून किंवा अंगीकृत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी व्यक्ति/संस्था पात्र असणार नाही.

३) खेड्यामधुन परसबाग वृध्दींगत करणाऱ्या महिलांचाही विचार या पुरस्कारासाठी करण्यात येतो.

४) कृषी विज्ञान मंडळ किंवा शेतकरी उत्पादक कंपन्या ज्या गावात सक्रिय आहे त्या मंडळाच्या/कंपन्यांच्या क्रियाशील सभासदांचा/प्रमुखांचा विचार या पुरस्कारासाठी करण्यात येतो.

५) कृषीविषयक दैनिक/साप्ताहिक मासिकामधुन लिखाणाद्वारे किंवा विविध स्तरावरील शेतकरी मेळावे/चर्चासत्र/प्रदर्शन इ.माध्यमातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारी व्यक्ति/संस्था यांचा विचार या पुरस्कारासाठी करण्यात येतो.

६) शासनाकडून यापूर्वी दिलेल्या पुरस्काराला किमान ५ वर्षा पेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला असावा.

७) शासनाच्या कृषी विभागामार्फत तसेच आत्मा अंतर्गत राबविण्यात आलेल्या शेतीशाळांमधील सुलभकर्ता, समन्वयक, शेतकरी यांचा विचार या पुरस्कारासाठी करता येईल.

८) प्रस्तावित शेतकरी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या स्वाक्षरीचा चारित्र्याचा दाखला मूळ प्रतीतच सादर करणे आवश्यक आहे.

९) प्रस्तावित शेतकरी शासन किंवा शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसल्याबाबत रु. १००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्र देण्यात यावे.

१०) प्रस्ताव सादर करताना त्यामध्ये ७/१२, ८-अ,मुळप्रतीत जोडणे ऐच्छीक राहिल.

**५) वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार**

**पुरस्काराचे स्वरुप** : शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब आणि नवनवीन पध्दतीने पीक लागवड, इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, शासन/सहकारी संस्थेकडून घेतलेल्या कर्ज रक्कमेचा शेतीसाठी सुयोग्य वापर इत्यादी निकषाअंतर्गत शेतकऱ्यांचे एकंदरीत कार्य विचारात घेऊन राज्य शासनाच्या कृषी विभागाकडून सर्वसाधारण आणि आदिवासी गटातील शेतकऱ्यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. रु.११,०००/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

**निकष**

१) शेतकऱ्यांच्या स्वतःच्या नावावर शेती असावी आणि तो कुटुंबीयासह शेती करणारा असावा.

२) प्रस्तावित शेतकरी हा शेतीपुरक धंद्याव्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय किंवा नोकरी करणारा नसावा.

३) शासकीय किंवा शासन अंगीकृत व सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवर काम करणारे किंवा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र असणार नाहीत. तसेच केंद्र किंवा राज्य शासनाकडून किंवा अंगीकृत संस्थेकडून कोणत्याही प्रकारचे नियमित मानधन घेणारी व्यक्ति पात्र असणार नाही.

४) आदिवासी शेतकऱ्यांच्या बाबतीत जातीचे प्रमाणपत्र आवश्यक

५) सर्वसाधारण आणि आदिवासी अशा दोन्ही गटाच्याबाबतीत ५ किंवा त्याहुन जास्त सालदार ठेवणांरा शेतकरी नसावा.

६) प्रस्तावित शेतकरी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या स्वाक्षरीचा चारित्र्याचा दाखला मूळ प्रतीतच सादर करणे आवश्यक आहे.

७) प्रस्तावित शेतकरी/गट/संस्था शेतकरी मासिकाचे सभासद असावेत.

८) प्रस्तावित शेतकरी शासन किंवा शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसल्याबाबत रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषीभूषण, जिजामाता कृषीभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार प्रस्ताव छाननी आणि निवडीकरिता तालुका/जिल्हा/विभाग/आयुक्तालयस्तरावरील समित्यांमार्फत कार्यवाही होऊन शासनस्तरावर अंतिम निवडीकरीता शिफारसीसह पाठविले जातात.

# राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना (अन्नधान्य, कडधान्य, गळीतधान्य व ऊस)

**१) पीकस्पर्धेचा उद्देश** : धान्य, कडधान्ये, गळीतधान्ये व ऊस पिकाचे दर हेक्टरी/एकरी उत्पादन वाढविण्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे हा या पीकस्पर्धा घेण्याचा उद्देश आहे. पीकस्पर्धा सर्वसाधारण गट व आदिवासी गट या दोन गटांमध्ये घेतल्या जातात.

**२) पीकस्पर्धेतील पिके** : या स्पर्धेमध्ये खालील पिकांचा समावेश होतो.

**अ) तृणधान्ये** : भात, खरीप ज्वारी, बाजरी, रब्बी ज्वारी, गहू, मका, उन्हाळी भात, नागली.

**ब) कडधान्ये** : हरभरा, तूर, मूग, उडीद.

**क) गळीतधान्ये** : खरीप भुईमुग, उन्हाळी भुईमुग, करडई, सूर्यफूल, सोयाबीन, जवस, तीळ.

**ड) ऊस** : (अ) आडसाली, (ब) सुरु, (क) खोडवा.

अन्नधान्य, कडधान्य, गळीतधान्य व ऊस पिकांच्या स्पर्धा फक्त सलग पिकासाठी (सोलक्रॉप) घेण्यात येतात.

**आडसाली ऊस** : ज्या पिकाची लागवड जुलैपासून सप्टेंबर अखेरपर्यंत केली आहे, अशा पिकास आडसाली पीक संबोधावे.

**सुरु ऊस** : ज्या पिकाची लागवड ऑक्टोबरपासून फेब्रुवारी अखेरपर्यंत केलेली आहे अशा पिकास सुरु पीक संबोधावे.

**खोडवा** : फेब्रुवारी अखेरपर्यंत जो ऊस तुटला आहे अशा पिकाचाच खोडवा स्पर्धेकरीता स्विकार करण्यात येईल. स्पर्धा केवळ पहिल्या खोडव्यापर्यंतच मर्यादित ठेवण्यात येईल.

**३) पीक स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या स्पर्धक शेतकऱ्याकडे लागवडीखाली आणावयाचे कमीतकमी क्षेत्र : (सर्व पिकांसाठी १० आर.)**

**४) पीक स्पर्धा जाहीर करण्यासाठी कमीतकमी किती स्पर्धक लागतात?**

| पीक स्पर्धा पातळी | सर्वसाधारण गट स्पर्धक संख्या | आदिवासी गट स्पर्धक संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १) पंचायत समिती पातळीवर | १० | ५ | प्रत्येक पिकासाठी |
| २) जिल्हा परिषद पातळीवर | १० | ५ | प्रत्येक पिकासाठी |
| ३) राज्य पातळीवर | १० | ५ | प्रत्येक पिकासाठी |

५) **स्पर्धेमध्ये कोणाला भाग घेता येतो?**

- कोणत्याही पातळीवरील स्पर्धेत भाग घेताना शेतकऱ्याकडे त्याच्या नावावर जमीन असणे आवश्यक आहे व जमीन तो स्वतः कसत असला पाहिजे.
- पंचायत समिती पातळीवरील स्पर्धेसाठी कोणत्याही शेतकऱ्याला भाग घेता येईल.
- ऊस पीक स्पर्धेत प्रवेश मिळविण्यासाठी व पात्र होण्याकरीता लहान शेतकऱ्याकडे कमीतकमी ०.२० हेक्टर म्हणजे १/२ एकर आणि इतर शेतकऱ्यांकडे ०.४० हेक्टर (१ एकर) एकत्रित ऊस क्षेत्र असावयास पाहिजे. लहान शेतकरी व इतर शेतकरी यांची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

  **लहान शेतकरी** : ज्याच्या/जिच्या नावावर स्वतःच्या मालकीची एकूण दोन हेक्टर पेक्षा अधिक जमीन नाही परंतु दोन हेक्टरपर्यंत ओलिताची जमीन असणारा प्रत्येक ऊस उत्पादक.

  **इतर शेतकरी** : ज्याच्या/जिच्या नांवावर स्वतःच्या मालकीची एकूण दोन हेक्टरपेक्षा अधिक ओलिताची जमीन असणारा प्रत्येक ऊस उत्पादक.
- कोणत्याही पातळीवरील स्पर्धामध्ये ज्या स्पर्धकांना भाग घेऊन बक्षिस मिळालेले नसेल अथवा त्यांनी स्पर्धेत नियमानुसार माघार घेतली असेल तर त्यांना पुन्हा त्याच पातळीवर त्याच हंगामासाठी त्याच पिकासाठी बक्षिस मिळेपर्यंत भाग घेता येईल.
- ज्या स्पर्धकांना स्पर्धेत दुसरा किंवा तिसरा क्रमांक मिळालेला आहे, अशा स्पर्धकांची इच्छा असल्यास पुन्हा पुढील वर्षी त्याच पिकासाठी त्याच हंगामात त्याच पातळीवर प्रवेश फी भरुन भाग घेता येईल.
- खालच्या पातळीवरील स्पर्धेत चालू सालचे स्पर्धेचे मागील ३ वर्षात पीक उत्पादनाचा क्रमांक पुढे नमुद केल्याप्रमाणे आला असेल तर अशा शेतकऱ्यांना नजिकच्या वरच्या पातळीवरील स्पर्धेत भाग घेता येईल.

**कोणत्या स्पर्धेत भाग घेऊन कोणता क्रमांक मिळविला तर, कोणत्या स्पर्धेत भाग घेता येईल?**

| | | |
|---|---|---|
| १ | पंचायत समिती पातळीवरील स्पर्धेत भाग घेऊन पीक उत्पादनाप्रमाणे १ ते ४ क्रमांक मिळविल्यास | जिल्हा परिषद पातळीवरील स्पर्धेत |
| २ | जिल्हा पातळीवरील पीकस्पर्धेत भाग घेऊन १ ते ५ क्रमांक मिळविल्यास | राज्य पातळीवरील स्पर्धेत |

स्पर्धा नियमावलीनुसार पुरेसे अर्ज न आल्यास स्पर्धा घडून येत नाहीत. सबब होतकरु पातळीवर भाग घेता येत नाही. म्हणून विशिष्ट पातळीवर सतत २ वर्ष अर्ज करुन देखील स्पर्धा घडुन न आल्यास ती पातळी वगळून त्या पुढील नजीकच्या पातळीवर त्या स्पर्धकांना भाग घेता येईल.

- एकाच वेळी एकाच पिकासाठी २ पातळीवरील स्पर्धेत शेतकऱ्यांना भाग घेता येणार नाही.
- परिक्षण समितीतील अशासकीय सदस्यांना त्याच पातळीवरील स्पर्धेमध्ये स्पर्धक म्हणून भाग घेता येणार नाही.
- स्पर्धेसाठी पात्रता ही वैयक्तिक गुणवत्तेनुसार प्राप्त होत असल्याने स्पर्धकाच्या वारसदारास स्पर्धेसाठी आवश्यक असणारी पात्रता ही वारसाहक्काने प्राप्त होऊ शकणार नाही.

६) स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क

निरनिराळ्या पातळीवरील स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क वाढविण्यात येत असून ते पुढीलप्रमाणे राहिल.

**अ) तृणधान्य, कडधान्य व गळीतधान्य**

(शुल्क रुपये)

| अ.क्र. | पातळी | सर्वसाधारण गट | आदिवासी गट |
|---|---|---|---|
| १ | पंचायत समिती पातळीसाठी | २०.०० | १०.०० |
| २ | जिल्हा परिषद पातळीसाठी | ४०.०० | २०.०० |
| ३ | राज्य पातळीसाठी | ६०.०० | ३०.०० |

**ब) ऊस पीक स्पर्धेसाठी निरनिराळ्या पातळीवरील प्रवेश शुल्क पुढीलप्रमाणे राहिल.**

| अ.क्र. | पातळी | रुपये |
|---|---|---|
| १ | पंचायत समिती पातळीसाठी | २०.०० |
| २ | जिल्हा परिषद पातळीसाठी | ४०.०० |
| ३ | राज्य पातळीसाठी | ६०.०० |

### ७) अर्ज दाखल करण्याची तारीख

निरनिराळ्या पातळीवरील निरनिराळ्या पीक स्पर्धेची अर्ज दाखल करण्याची तारीख पुढीलप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | पीकस्पर्धा हंगाम | अर्ज दाखल करावयाची तारीख |
|---|---|---|
| १ | खरीप पीकस्पर्धा | प्रत्येक वर्षासाठी ऑगस्टची १५ तारीख |
| २ | रब्बी पीकस्पर्धा | प्रत्येक वर्षासाठी डिसेंबरची ३१ तारीख |
| ३ | उन्हाळी हंगाम पीकस्पर्धा (वायंगण भात पिकासाठी) | प्रत्येक वर्षासाठी फेब्रुवारीची १५ तारीख |
| ४ | उन्हाळी पीकस्पर्धा (इतर पिकासाठी) | प्रत्येक वर्षासाठी एप्रिलची १५ तारीख |

**ऊस पिकाच्या विविध प्रकारांसाठी अर्ज स्विकारण्याची अखेरची तारीख पुढीलप्रमाणे राहील.**

| | | |
|---|---|---|
| १ | आडसाली ऊस | १५ सप्टेंबर |
| २ | सुरु ऊस | १५ फेब्रुवारी |
| ३ | खोडवा ऊस | १५ फेब्रुवारी |

प्रत्येक वर्षातील हंगामाच्या व पिकाच्या परिस्थितीप्रमाणे अर्ज स्विकारण्याची अखेरची मुदत वाढवून देण्याचा अधिकार संबंधित कृषी उपसंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहील.

**८) निरनिराळ्या पातळीवर पुढीलप्रमाणे बक्षिसे दिली जातील.**

| अ.क्र. | स्पर्धा पातळी | सर्वसाधारण गट बक्षिस रुपये | | | आदिवासी गट बक्षिस रुपये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पहिले | दुसरे | तिसरे | पहिले | दुसरे | तिसरे |
| १ | पंचायत समिती | २५०० | १५०० | १००० | २५०० | १५०० | १००० |
| २ | जिल्हा पातळी | ५००० | ३००० | २००० | ५००० | ३००० | २००० |
| ३ | राज्य पातळी | १०,००० | ७००० | ५००० | १०,००० | ७००० | ५००० |

# प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY)

**योजनेचा उद्देश**

ही योजना खरीप हंगाम २०१६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. अधिसूचित पिकांना नैसर्गिक आपत्ती, कीड व रोग इ. बाबींपासून विमा संरक्षण देणे व नुकसानीच्या प्रमाणात नुकसान भरपाई देऊन पीक नुकसानीच्या कठीण कालावधीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य राखणे, हा या योजनेचा उद्देश आहे.

- **समाविष्ट पिके** : (१५ पिके) (खरीप हंगाम)
- **तृणधान्य** : भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, मका.
- **कडधान्य** : तूर, मूग, उडीद.
- **गळीत धान्य** : भुईमूग, सोयाबीन, तीळ, कारळे, सूर्यफूल.
- **नगदी पिके** : कापूस व कांदा.
- **समाविष्ट पिके** : (०८ पिके) (रब्बी हंगाम)

- **तृणधान्य व कडधान्य** : उन्हाळी भात, गहू (बागायत व जिरायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत), हरभरा
- **गळीत धान्य** : उन्हाळी भुईमूग, करडई, सूर्यफूल.
- **नगदी पिके** : रब्बी कांदा.

**सहभागी शेतकरी**

अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. कर्जदार शेतकऱ्यांना योजना बंधनकारक असून बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजना ऐच्छिक राहील.

**विमा संरक्षण**

१) पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट.

२) प्रतिकूल हवामानामुळे पिकाची पेरणी/लावणी न झाल्यास होणारे नुकसान.

३) पीक कालावधीत प्रतिकूल हवामानामुळे होणारे नुकसान.

४) काढणी पश्चात नुकसान

५) स्थानिक नैसर्गिक आपत्ती (गारपीट, भुस्खलन, पुराचे पाणी शेतात आल्यास)

- **जोखीमस्तर** : या योजनेअंतर्गत ७० टक्के जोखिमस्तर देय आहे.

**विमा हप्ता व अनुदान**

शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के, रब्बी हंगामासाठी १.५ टक्के व नगदी पिकांसाठी ५ टक्के असा किंवा वास्तवदर्शी दर यापैकी जो कमी असेल तो राहील. उर्वरित विमा हप्ता रक्कम ही अनुदान स्वरुपात केंद्र व राज्य शासनामार्फत समप्रमाणात देय राहील.

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विजेचा शॉक बसणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणामुळे होणारे अपघात यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढावतो किंवा अपंगत्व येते. घरातील कर्त्याव्यक्तिस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस/त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरीता शासनाने सन २०१५-१६ पासून **गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना** राज्यात सुरु केली आहे. सन २०१८-१९ मध्ये सदर योजना दि. ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनी लि.पुणे या विमा कंपनीमार्फत राबविण्यात येत असून जयका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा.लि.नागपूर ही विमा सल्लागार कंपनी आहे.

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत मिळणारे लाभ पुढीलप्रमाणे राहतील.**

| अ.क्र. | अपघाताची बाब | नुकसान भरपाई |
|---|---|---|
| १ | अपघाती मृत्यू | रुपये २,००,०००/- |
| २ | अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी होणे | रुपये २,००,०००/- |
| ३ | अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी होणे | रुपये २,००,०००/- |
| ४ | अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी होणे | रुपये १,००,०००/- |

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये**

१) शेतकऱ्यांनी स्वतः किंवा त्यांच्यावतीने अन्य कोणत्याही संस्थेने या योजनेत पुन्हा स्वतंत्ररित्या विमा हप्त्याची रक्कम भरण्याची गरज नाही. शासनाकडून सर्व खातेदार शेतकऱ्यांचा विमा हप्ता भरण्यात येतो.

२) यापूर्वी शेतकऱ्यांनी अथवा त्यांच्यावतीने अन्य कोणत्याही संस्थेने कोणतीही वेगळी विमा योजना लागू केली असल्यास अथवा विमा उतरविला असल्यास त्याचा या योजनेशी काहीही संबंध राहणार नाही. या विमा योजनेअंतर्गत मिळणारे लाभ स्वतंत्र असतील.

३) योजनेचा लाभ मिळण्यासाठी विहित केलेली प्रपत्रे/कागदपत्रे वगळता अन्य कोणतीही कागदपत्रे शेतकऱ्यांनी वेगळ्याने सादर करण्याची आवश्यकता नाही.

**लाभार्थी पात्रतेच्या अटी व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

१) महाराष्ट्र राज्यातील १० ते ७५ वयोगटातील महसूल नोंदीनुसार असलेला खातेदार शेतकरी.

२) शेतकरी म्हणून त्याच्या नावाचा समावेश असलेला **७/१२** किंवा ८-अ नमुन्यातील उतारा

३) ज्या नोंदीवरुन अपघातग्रस्त शेतकऱ्याचे नाव ७/१२ वर आले असेल अशी संबंधित फेरफार नोंद (गाव नमुना नंबर **६-ड)**

४) शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठ्याकडील गाव नमुना नं. **६-क** नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद.

५) अपघाताच्या स्वरुपानुसार विहित केलेली इतर कागदपत्रे.

**विमा संरक्षणामध्ये समाविष्ट बाबी**

(१) रस्ता/रेल्वे अपघात (२) पाण्यात बुडून मृत्यू (३) जंतूनाशके हाताळताना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा (४)

विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात. (५) वीज पडून मृत्यू (६) खून (७) उंचावरुन पडून झालेला अपघात (८) सर्पदंश व विंचुदंश (९) नक्षलवाद्याकडून झालेल्या हत्या (१०) जनावरांच्या खाल्ल्यामुळे/चावण्यामुळे जखमी/मृत्यू (११) दंगल (१२) अन्य कोणतेही अपघात.

**विमा संरक्षणामध्ये समाविष्ट नसणाऱ्या बाबी**

(१) नैसर्गिक मृत्यू (२) विमा कालावधीपुर्वीचे अपंगत्व (३) आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वतःला जखमी करुन घेणे (४) गुन्ह्याच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करतांना झालेला अपघात (५) अंमली पदार्थाच्या अमलाखाली असताना झालेला अपघात (६) भ्रमिष्टपणा (७) बाळंतपणातील मृत्यू (८) शरीरांतर्गत रक्तस्त्राव (९) मोटार शर्यतीतील अपघात (१०) युध्द (११) सैन्यातील नोकरी (१२) जवळच्या लाभधारकाकडून खून.

**वारसदार**

(अ) मृत शेतकऱ्याची पत्नी/मृत शेतकरी स्त्रीचा पती (ब) मृत शेतकऱ्याची अविवाहित मुलगी (क) मृत शेतकऱ्याची आई (ड) मृत शेतकऱ्याचे मुलगे (ई) मृत शेतकऱ्याची नातवंडे (फ) मृत शेतकऱ्याची विवाहित मुलगी.

**विमा प्रस्ताव सादर करण्याची पध्दती**

शेतकरी/वारसदाराने विमा कालावधीत तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडे पाठवावयाचा आहे. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या प्रस्तावांची नोंद घेऊन शासनाच्या विमा सल्लागार यांच्या विभागीय कार्यालयाकडे पाठवतील. विमा सल्लागार यांच्या कार्यालयाकडून प्राथमिक छाननी होऊन तो प्रस्ताव विमा कपंनीकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवतील.

**महत्वाचे मुद्दे**

१) या योजनेअंतर्गत विमा रक्कम मिळविणेसाठी कृषी विभागाकडून सहाय्य करण्यात येते. सन २०१८-१९ वर्षात सदर विमा प्रस्ताव या योजनेच्या कामकाजासाठी व सल्ल्यासाठी शासनाने नेमलेले अधिकृत विमा सल्लागार **जयका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा.लि.नागपूर यांचेमार्फत पाठविण्यात येतात. सल्लागार कंपनीचा टोल फ्री क्रमांक १८००२३३३५३३ असा आहे.** परिपूर्ण विमा प्रस्ताव विमा कंपनीकडून मंजूर करुन घेण्यासाठी कृषी विभागाकडून सर्वतोपरी सहाय्य केले जात असल्याने त्यासाठी कोणत्याही खाजगी व्यक्ती, मध्यस्थ, दलाल इत्यादींचे सहाय्य घेण्याची आवश्यकता नाही. शेतकरी व वारसदारांनी खाजगी व्यक्तिंशी संपर्क न साधता थेट कृषी विभाग किंवा अधिकृत विमा सल्लागार कंपनी - **जयका इन्शुरन्स ब्रोकरेज प्रा.लि.,नागपूर यांचेशी संपर्क साधावा.** विमा कंपनीकडून मंजूर होणारी रक्कम एन.ई.एफ.टी.द्वारे थेट लाभार्थी शेतकऱ्याच्या बँक खात्यावर जमा करण्यात येत असल्याने मध्यस्थांच्या कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये.

(२)शेतकऱ्याने/वारसदाराने त्यांचा विमा प्रस्ताव थेट विमा कंपनीकडे पाठवू नये. सदरचा प्रस्ताव परिपूर्ण कागदपत्रांसह तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फतच सादर करावा.

(३) प्रस्तावासोबत सादर करावयाचा '६-क' चा उतारा म्हणजेच वारसाहक्काचे नोंदवहीचा उतारा हा अपघातग्रस्त शेतकरी मयत झाल्यानंतर त्याच्या वारसांची नोंद झालेला उतारा प्रकरणासोबत सादर करावा. अपघातग्रस्त शेतकऱ्याचे कोण वारस आहेत हे पाहण्यासाठी सदरचा उतारा आवश्यक असतो.

(४) प्रस्तावासोबत सादर करावयाचा '६-ड' चा उतारा म्हणजेच फेरफारचा उतारा हा अपघातग्रस्त शेतकऱ्याचे नाव ज्या फेरफार नोंदीअन्वये ७/१२ उताऱ्यास दाखल झाले आहे असा उतारा सादर करावा. त्यावरुन अपघातग्रस्त शेतकऱ्याचे नाव कोणत्या वेळी ७/१२ उताऱ्यास दाखल झाले आहे हे पाहण्यासाठी सदरचा उतारा आवश्यक आहे. विमा पॉलिसी सुरु होण्याच्या दिवसापर्यंत ज्यांची नावे ७/१२ उताऱ्यावर दाखल झाली आहे असेच शेतकरी या योजनेस पात्र आहेत.

(५) या योजने अंतर्गत दरवर्षी नवीन पॉलिसी घेण्यात येते. ज्या-त्या पॉलिसी कालावधीत झालेल्या अपघाताचे प्रस्ताव त्या-त्या विमा कंपनीकडे त्या वर्षीच्या विमा सल्लागारामार्फतच पाठविणे आवश्यक आहे. मृत्यूचा दिनांक विचारात न घेता प्रत्यक्ष अपघात घडल्याचा दिनांक विचारात घेऊन संबंधित कंपनीकडे प्रस्ताव सादर करावा.

(६) सदर योजनेबाबतचे शासन निर्णय व मार्गदर्शक सूचना या www.krishi.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

**योजनेची उद्दिष्टे**

अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देणे.

योजनेची व्याप्ती : राज्यातील सर्व ३४ जिल्हे

अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सन १९८२-८३ पासून राबविण्यात येत असलेली विशेष घटक योजना बदललेल्या परिस्थितीची गरज विचारात घेऊन जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याच्या दृष्टिकोनातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना या नावाने सन २०१६-१७ पासून राबविण्यात येत आहे.

१) सदर योजने अंतर्गत खालील घटकासाठी त्यापुढे नमूद रकमेच्या मर्यादेत अनुदान देण्यात येते.

| अ.क्र. | बाब | उच्चतम अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| १ | नवीन विहीर | रुपये २,५०,०००/- |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | रुपये ५०,०००/- |
| ३ | इनवेल बोअरिंग | रुपये २०,०००/- |
| ४ | पंप संच | रुपये २०,०००/- |
| ५ | वीज जोडणी आकार | रुपये १०,०००/- |
| ६ | शेततळ्यांचे प्लॅस्टिक अस्तरीकरण | रुपये १,००,०००/- |
| ७ | सूक्ष्म सिंचन संच | ठिबक - ५०,०००/- |
| | | तुषार - २५,०००/- |

२) या योजनेंतर्गत वरील ७ बाबी असून लाभ पॅकेज स्वरुपात द्यावयाचा आहे. खालील पॅकेजमधील एका पॅकेजचा लाभ लाभार्थ्यास अनुज्ञेय राहील.

**१) नवीन विहीर पॅकेज** : नवीन विहीर, पंपसंच, वीजजोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग.

**२) जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज** : जुनी विहीर दुरुस्ती, पंपसंच, वीजजोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग.

**३) शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण पॅकेज** : शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, पंपसंच, वीजजोडणी आकार व सूक्ष्म सिंचन संच.

४) ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच शासकीय योजनेतून विहीर घेतली असेल किंवा स्वखर्चाने विहीर बांधली असेल अशा शेतकऱ्यांना पंपसंच, वीजजोडणी आकार व सूक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी अनुदान देय राहील.

**५) सोलरपंपासाठी अनुदान** : जर शेतकऱ्यास महावितरण कंपनीकडून सोलरपंप मंजूर झाला असेल तर पंपसंच व वीजजोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु.३५ हजार) लाभार्थी हिस्स्याची रक्कम महावितरण कंपनीस अदा करता येईल.

६) वरील घटकांपैकी लाभार्थ्याकडे काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकांचा लाभ घेण्यासाठी खालील आवश्यक घटकांची निवड करावी.

१) पंप संच, २) वीजजोडणी आकार ३) सूक्ष्म सिंचन संच

**लाभार्थी पात्रतेच्या अटी**

१) लाभार्थी हा अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकरी असला पाहिजे.

२) शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.

३) शेतकऱ्याकडे त्याच्या स्वतःचे नावे किमान ०.४० हेक्टर व कमाल ६.०० हेक्टर शेतजमीन असली पाहिजे.

४) शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे.

५) लाभार्थ्याकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.

६) लाभार्थ्याचे बँक खाते असणे व सदर बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

७) दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य.

८) दारिद्र्यरेषेखालील नसलेले अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त नसेल तरच या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील.

९) दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) यादीत अंतर्भुत शेतकऱ्यांसाठी वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेची अट नाही. परंतु ज्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये १,५०,०००/- चे मर्यादेत आहे अशा शेतकऱ्यांनी संबंधित तहसीलदार यांच्याकडून मागील वर्षाचा उत्पन्नाचा अद्ययावत दाखला घेऊन अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

**जिल्हा निवड समिती**

पंचायत समिती स्तरावरुन जिल्हा परिषद कार्यालयात शिफारसीसह प्राप्त होणाऱ्या पात्र अर्जदारांच्या तयार केलेल्या यादीमधून लाभार्थ्यांची निवड अंतिम करण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर समिती नियुक्त करण्यात येईल.

या योजने अंतर्गत निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना याच

आर्थिक वर्षाच्या कालावधीत योजने अंतर्गत मंजूर विविध घटकांचा लाभार्थ्यांच्या मागणीनुसार उपलब्ध अनुदान मर्यादेत व प्रती लाभार्थी विहित उच्चतम अनुदान मर्यादेत लाभ द्यावयाचा आहे.

**योजनेची अंमलबजावणी**

**१)नवीन विहीर** : नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने यापूर्वी केंद्र/राज्य/जिल्हा परिषद निधीतून नवीन सिंचन विहिरीचा लाभ घेतलेला नसावा. तसेच यापूर्वी शासकीय योजनेतून घेतलेल्या व अर्धवट राहिलेल्या अपूर्ण विहिरीचे काम करण्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही. लाभार्थ्याच्या ७/१२ वर तसेच शेतात प्रत्यक्ष विहीर असल्यास या घटकाचा लाभ घेता येणार नाही. नवीन विहीर घ्यावयाच्या स्थळापासून ५०० फुटाच्या अंतरामध्ये दुसरी विहीर नसावी. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे वरिष्ठ भू वैज्ञानिक यांच्याकडील पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**२)जुनी विहीर दुरुस्ती** : जुनी विहिर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांच्या ७/१२ वर विहिरीची नोंद असावी. विहिरीच्या कामास उच्चतम अनुदान मर्यादेपेक्षा अधिक रक्कम लागल्यास लाभार्थ्याने स्वतः उभी करावयाची आहे.

**३)इनवेल बोअरींग** : नवीन विहीर/जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने इनवेल बोअरींगची मागणी केल्यास रु. २० हजाराच्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. इनवेल बोअरींगचे काम करताना खर्चाचे अंदाजपत्रक व तांत्रिक निकषानुसार ठिकाणाची योग्यता (Feasibility Report) भूजल सर्वेक्षण यंत्रणेकडून प्राप्त करुन घ्यावी.

**४)पंपसंच** : पंपसंचाच्या लाभासाठी निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांनी पंपसंच खरेदीकरिता कृषि विकास अधिकारी यांची पूर्वसंमती घ्यावी. लाभार्थ्यांनी एक महिन्याच्या कालावधीत पंपसंचाची खरेदी करणे आवश्यक राहील अन्यथा अशा शेतकऱ्यांची पूर्वसंमती रद्द करण्यात येईल. केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम संस्थांनी पंपसंचाची रीतसर तपासणी (testing) करुन ते अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार (standards) असल्याचे प्रमाणित केले असेल त्याच पंपसंचाची पूर्वसंमती प्राप्त लाभार्थी शेतकऱ्याने खरेदी करावयाची आहे.

**५)वीज जोडणी आकार** : नवीन विहीर पॅकेज/जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज/शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, पॅकेजमधील तथा आवश्यकतेनुसार केवळ वीजजोडणी मागणी करणाऱ्या लाभार्थ्याने विद्युत वितरण कंपनीकडे कोटेशन भरल्याची पावती कृषि अधिकारी (वि.घ.यो.), पंचायत समिती यांच्याकडे सादर करावी. लाभार्थ्यांनी सादर केलेल्या पावतीनुसार विद्युत वितरण कंपनीकडे खातरजमा करुन कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात कृषि विकास अधिकारी यांनी इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफरद्वारे विहित अनुदान मर्यादेत अनुदान वर्ग करण्यात येईल.

**६)शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण** : ज्या शेतकऱ्यास ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मागेल त्याला शेततळे या योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या व डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचे पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांना शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ घेता येईल.

**७)सूक्ष्म सिंचन संच** : सूक्ष्म सिंचनासाठी देण्यात येणारे अनुदान हे प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांनां सूक्ष्म सिंचनासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानास पूरक अनुदान म्हणून देण्यात येईल.

**अर्ज व त्यावरील कार्यपध्दती**

**या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी निवडीचे निकष पूर्ण करणाऱ्या अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. अर्ज भरण्याची सुविधा कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेत स्थळावरील https://agriwell.mahaonline.gov.in या साइटवर उपलब्ध करुन देण्यात येते.**

अ) योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदाराने ऑनलाइन सादर केलेल्या अर्जाची प्रत ग्रामसभेच्या शिफारसीने आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वसांक्षाकित छायांकित प्रतीसह कृषि अधिकारी (वि.घ.यो.) पंचायत समिती यांच्याकडे स्वहस्ते सादर करावा.

ब) जिल्ह्याच्या लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हा परिषद स्तरावर प्राप्त परिपूर्ण अर्जातून लॉटरी पध्दतीने लाभार्थी निवड करण्यात येईल.

क) वैयक्तिक लाभार्थी निवडताना महिला व अपंग लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

# बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील)

**योजनेची उद्दिष्टे**

अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देणे.

**समाविष्ट जिल्हे** : ठाणे,पालघर,रायगड,नाशिक,धुळे,नंदुरबार, जळगाव,पुणे,अहमदनगर,नांदेड,अमरावती,यवतमाळ,नागपूर, गोंदिया,चंद्रपूर व गडचिरोली. या १६ जिल्ह्यात योजना राबविण्यात येते.

**क्षेत्राबाहेरील** : ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, अहमदनगर, सोलापूर, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली ह्या २९ जिल्ह्यांत ही योजना राबविण्यात येते.

अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सन १९९३-९४ पासून राबविण्यात येत असलेली आदिवासी उपयोजना बदललेल्या परिस्थितीची गरज विचारात घेऊन जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याच्या दृष्टिकोनातून बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या नावाने सन २०१७-१८ पासून राबविण्यात येत आहे.

**१) सदर योजनेअंतर्गत खालील घटकांसाठी त्यापुढे नमुद रकमेच्या मर्यादेत अनुदान देण्यात येते.**

| अ.क्र. | बाब | उच्चतम अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| १ | नवीन विहीर | २,५०,०००/- |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | ५०,०००/- |
| ३ | इनवेल बोअरींग | २०,०००/- |
| ४ | परसबाग | ५००/- |
| ५ | वीज जोडणी आकार | १०,०००/- |
| ६ | शेततळ्यांचे प्लॅस्टिक अस्तरीकरण | १,००,०००/- |
| ७ | सूक्ष्म सिंचन संच | ठिबक : ५०,०००/-<br>तुषार : २५,०००/- |
| ८ | पंपसंच | २०,०००/- |
| ९ | पाईप | ३०,०००/- |

या याजनें अंतर्गत वरील ७ बाबी असून लाभ पॅकेज स्वरुपात द्यावयाचा आहे. खालील पॅकेजमधील एका पॅकेजचा लाभ लाभार्थ्यास अनुज्ञेय राहील.

**१) नवीन विहीर पॅकेज**

नवीन विहीर, वीजजोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, परसबाग व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग.

**२) जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज**

जुनी विहीर दुरुस्ती, वीजजोडणी आकार, सूक्ष्म सिंचन संच, परसबाग व आवश्यकतेनुसार इनवेल बोअरींग

**३) शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण पॅकेज**

शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, वीजजोडणी आकार, परसबाग व सूक्ष्म सिंचन संच. ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच शासकीय योजनेतून विहीर घेतली असेल किंवा स्वखर्चाने विहीर बांधली असेल अशा शेतकऱ्यांना वीजजोडणी आकार, परसबाग व सूक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी अनुदान देय राहील. वरील घटकांपैकी लाभार्थ्याकडे काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकांचा लाभ घेण्यासाठी पुढील आवश्यक घटकांची निवड करावी.

**१) वीजजोडणी आकार २) सूक्ष्म सिंचन संच ३) परसबाग ४) पंपसंच ५) पीव्हीसी पाईप**

**सोलरपंपासाठी अनुदान**

जर शेतकऱ्यास महावितरण कंपनीकडून सोलरपंप मंजूर झाला असेल तर पंपसंच व वीजजोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु.३० हजार) लाभार्थी हिस्स्याची रक्कम महावितरण कंपनीस अदा करता येईल.

**लाभार्थी पात्रतेच्या अटी**

१) लाभार्थी हा अनुसूचित जमातीचा शेतकरी असला पाहिजे.

२) शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे.

३) शेतकऱ्याकडे त्याच्या स्वतःचे नावे किमान ०.४० हेक्टर व कमाल ६.०० हेक्टर शेतजमीन असली पाहिजे.

४) शेतकऱ्याच्या नावे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८ अ उतारा असणे आवश्यक आहे.

५) लाभार्थ्याकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.

६) लाभार्थ्यांचे बँक खाते असणे व हे बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

७) दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य.

८) दारिद्र्य रेषेखालील नसलेले अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्याचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त नसेल तरच या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील.

९) दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) यादीत अंर्तभुत शेतकऱ्यांसाठी वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेची अट नाही. परंतु ज्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये १,५०,०००/- चे मर्यादेत आहे अशा शेतकऱ्यांनी संबंधित तहसीलदार यांच्याकडून मागील वर्षाचा उत्पन्नाचा अद्ययावत दाखला घेऊन अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

**जिल्हा निवड समिती**

ठिबक रु. ५० हजार, तुषार रु. २५ हजार. पंचायत समिती स्तरावरुन जिल्हा परिषद कार्यालयास शिफारसीसह प्राप्त होणाऱ्या पात्र अर्जदारांच्या तयार केलेल्या यादीमधून लाभार्थ्यांची निवड अंतिम करण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर समिती नियुक्त करण्यात येईल.

या योजने अंतर्गत निवड करण्यांत आलेल्या लाभार्थ्यांना याच आर्थिक वर्षाच्या कालावधीत योजने अंतर्गत मंजूर विविध घटकांचा लाभार्थ्यांच्या मागणीनुसार उपलब्ध अनुदान मर्यादेत व प्रती लाभार्थी विहित उच्चतम अनुदान मर्यादेत लाभ द्यावयाचा आहे.

**घटक अंमलबजावणी**

**१) नवीन विहीर** : नवीन विहीर या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने यापूर्वी केंद्र/राज्य/जिल्हा परिषद निधीतून नवीन सिंचन विहिरीचा लाभ घेतलेला नसावा. तसेच यापूर्वी शासकीय योजनेतून घेतलेल्या व अर्धवट राहिलेल्या अपूर्ण विहिरीचे काम करण्यास या योजनेचा लाभ घेता येणार नाही. लाभार्थ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर तसेच शेतात प्रत्यक्ष विहीर असल्यास या घटकाचा लाभ घेता येणार नाही. नवीन विहीर घ्यावयाच्या स्थळापासून ५०० फुटाच्या अंतरामध्ये दुसरी विहीर नसावी. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडे वरिष्ठ भू वैज्ञानिक यांच्याकडील पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**२) जुनी विहीर दुरुस्ती** : जुनी विहिरी दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांच्या ७/१२ वर विहिरीची नोंद असावी. विहिरीच्या कामास उच्चतम अनुदान मर्यादेपेक्षा (रु. ५०,०००/-) अधिक रक्कम लागल्यास लाभार्थ्याने स्वतः उभी करावयाची आहे.

**३) इनवेल बोअरींग** : नवीन विहीर/जुनी विहीर दुरुस्ती या घटकाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्याने इनवेल बोअरींगची मागणी केल्यास २०,०००/- च्या मर्यादेत अनुदान अनुज्ञेय राहील. इनवेल बोअरींगचे काम करताना खर्चाचे अंदाजपत्रक व तांत्रिक निकषानुसार ठिकाणाची योग्यता (Feasibility Report) भूजल सर्वेक्षण यंत्रणेकडून प्राप्त करुन घ्यावा.

**४) वीज जोडणी आकार** : नवीन विहीर पॅकेज/जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज/शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण पॅकेजमधील तथा आवश्यकतेनुसार केवळ वीजजोडणी मागणी करणाऱ्या लाभार्थ्याने विद्युत वितरण कंपनीकडे कोटेशन भरल्याची पावती कृषि अधिकारी (वि.घ.यो.), पंचायत समिती यांच्याकडे सादर करावी. लाभार्थ्यांनी सादर केलेल्या पावतीनुसार विद्युत वितरण कंपनीकडे खातरजमा करुन कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत लाभार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यांत कृषि विकास अधिकारी यांनी इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफरद्वारे विहित अनुदान मर्यादेत अनुदान वर्ग करण्यात येईल.

**५) शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण** : ज्या शेतकऱ्यास ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत लाभ घेतलेल्या व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेचे पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण या घटकाचा लाभ घेता येईल.

**६) सूक्ष्म सिंचन संच** : सूक्ष्म सिंचनासाठी देण्यात येणारे अनुदान हे प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानास पूरक अनुदान म्हणून देण्यात येईल.

**७) परसबाग** : आदिवासी शेतकऱ्यांना कुटुंबासाठी लागणारा भाजीपाला त्यांचे घराभोवतीच पिकविणे शक्य आहे. यासाठी शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या प्रकारची भाजीपाला उदा. भेंडी, गवार, चवळी, दुधी भोपळा, डांगर भोपळा, शेवगा, काकडी, दोडका इ. बियाण्यांचे कीट लाभार्थ्यांनी महाबीज/एन.एस.सी. इत्यादी बियाणे उत्पादक कंपनीच्या अधिकृत परवानाधारक विक्रेत्याकडून खरेदी करण्यासाठी रु. ५००/- च्या मर्यादेत अनुदान देय राहील.

**८) पंपसंच** : पंपसंचाच्या लाभासाठी निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांनी पंपसंच खरेदीकरीता कृषि विकास अधिकारी यांची पूर्वसंमती घ्यावी. लाभार्थ्यांनी एक महिन्याच्या कालावधीत पंपसंचाची खरेदी करणे आवश्यक राहील अन्यथा अशा शेतकऱ्यांची पूर्वसंमती रद्द करण्यात येईल. केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम संस्थांनी पंपसंचाचे रीतसर तपासणी (testing) करुन ते अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार (standards) असल्याचे प्रमाणित केले असेल, त्याच पंपसंचाची पूर्वसंमती प्राप्त लाभार्थी शेतकऱ्याने खरेदी करावयाची आहे.

**९) पीव्हीसी पाईप** : सिंचनासाठी मान्यता प्राप्त प्रकाराच्या आय.एस.आय. मार्क पाईपची लाभार्थ्यांनी पूर्व संमतीने त्यांच्या पसंतीनुसार खरेदी करावी. प्रति लाभार्थी एकूण लाभाची उच्चतम मर्यादा रु. ३०,०००/- राहिल. पाईपची खरेदी केल्यानंतर त्याबाबतचे देयक (Invoice) लाभार्थ्यांनी कृषि अधिकारी (वि.घ्र.यो.), पंचायत समिती यांच्याकडे सादर करावे.

**अर्ज व त्यावरील कार्यपध्दती**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी निवडीचे निकष पूर्ण करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. अर्ज भरण्याची सुविधा कृषि विभागाच्या www. krishi. maharashtra. gov.in या संकेतस्थळावरील https:// agriwell. mahaonline. gov.in या साईटवर उपलब्ध करुन

देण्यात येते. (अ) योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या अर्जदाराने ऑनलाइन सादर केलेल्या अर्जाची प्रत ग्रामसभेच्या शिफारसीने आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रतीसह कृषि अधिकारी (वि.घ.यो.) पंचायत समिती यांच्याकडे स्वहस्ते सादर करावा. (ब) जिल्ह्याच्या लक्षांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हा परिषद स्तरावर प्राप्त परिपूर्ण अर्जातून लॉटरी पध्दतीने लाभार्थी निवड करण्यात येईल. (क) वैयक्तिक लाभार्थी निवडताना महिला व अपंग लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

# राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान (NMSA) अंतर्गत कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD)

राज्यातील शेती प्रामुख्याने कोरडवाहू आहे. यामध्ये पेरणीयोग्य क्षेत्रापैकी ८३ टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे. अन्नधान्याच्या मागणीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्यामुळे कोरडवाहू क्षेत्रातील उत्पादकतेत हवामान बदलाशी सुसंगत तंत्रज्ञानाचा वापर करुन शाश्वतता आणणे तसेच या क्षेत्रामध्ये आपत्ती काळातील नुकसान भरपाईसाठी कृषी आधारित उपजिविका साधनामध्ये विविधता आणणे महत्वाचे ठरते. कोरडवाहू क्षेत्र विकास या घटकामध्ये पिके, फळपिके, पशुधन, मत्स्य, वने यांचा समावेश असलेल्या एकात्मिक शेती पध्दती विकसीत करुन; त्यास स्थैर्य निर्माण करुन आपत्ती काळात उपजिविकेच्या पर्यायी संधी शेतकऱ्यांना उपलब्ध करता येणार आहेत. अधिक माहितीसाठी कृषी उपसंचालक (कोरडवाहू क्षेत्र विकास), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

**योजनेचे उद्देश**

- शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत शाश्वत वाढ करुन नवीन उपजिविकेच्या साधनांची उपलब्धता करणे व त्याआधारे त्यांचे जीवनमान उंचावणे.
- निरनिराळ्या एकात्मिक शेती पध्दतींचा अवलंब करुन दुष्काळ, पूर व हवामानातील अनपेक्षित बदलामुळे होणारे नुकसान टाळणे.
- अद्ययावत कृषी तंत्रज्ञानाचा वापर करुन कृषी उत्पादन वाढविणे व शाश्वत रोजगार उपलब्ध करणे.
- कोरडवाहू क्षेत्रातील कृषी उत्पादनातील जोखीम कमी करुन शेतकऱ्यांचा कोरडवाहू शेतीबाबत आत्मविश्वास वाढविणे.

**समाविष्ट जिल्हे**

कोरडवाहू क्षेत्र विकास (RAD) घटकामध्ये राज्यातील सर्व जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने हमखास सिंचनाखाली न येणाऱ्या क्षेत्रामध्ये हा घटक राबविला जाणार आहे.

**लाभार्थी निवडीचे निकष**

- सिंचनाची सुविधा नसलेल्या शेतकऱ्यांना तसेच अल्प व अत्यल्प भूधारक व महिला शेतकऱ्यांना प्राधान्य.
- लाभार्थी हा सध्याच्या प्रचलित पीक पध्दतीमध्ये बदल करुन एकात्मिक शेती पध्दतीतील बाबी राबविण्यास इच्छुक असला पाहिजे.

**योजनेचे स्वरुप**

अ) प्रत्येक उपविभागातून कायमस्वरुपी सिंचन सुविधा उपलब्ध नसलेल्या क्षेत्रामधील दोन प्रकल्पांची निवड.

ब) प्रकल्प क्षेत्र शक्यतो एकाच गावात परंतु अपवादात्मक परिस्थितीत प्रकल्पासाठी लगतच्या दोन ते तीन गावांची निवड.

क) **एकात्मिक शेती पध्दती** या उपघटकातील पीक आधारित, फळपिक आधारित शेती पध्दती, दुग्धउत्पादन आधारित शेती पध्दती, पशुधन आधारित शेती पध्दती या बाबींसाठी ५० टक्के अनुदान देय. तसेच **शेती विकास आणि मुल्यवर्धन** या उपघटकातील ग्रीनहाऊस ट्युबलर पाईप आणि शेडनेट हाऊस, मधुमक्षिकापालन, काढणीपश्चात व साठवण तंत्रज्ञान, गांडुळ खत व भू-सुधारणा या बाबींसाठी ५० टक्के अनुदान देय असून मूरघास युनिट, सामुहिक शेततळे, सिमेंट नालाबांध व प्रशिक्षण या बाबीसाठी १०० टक्के अनुदान देय आहे.

**अंमलबजावणी**

- कोरडवाहू क्षेत्र विकास या योजनेमध्ये Cluster Approach हे धोरण स्विकारले असून, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रत्येक कृषि उपविभागातून दोन याप्रमाणे एकूण १८० प्रकल्पांची निवड करुन, राबविण्यात येत आहे.
- या योजनेअंतर्गत निधीच्या १६ टक्के व ८ टक्के किंवा अनुसुचित जाती/जमाती यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुक्रमे अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती या प्रवर्गासाठी तरतूद करण्यात आली आहे.
- या योजनेसाठी सन २०१४-१५ मध्ये १०० टक्के केंद्र शासनाकडून अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले. तथापी, सन २०१५-१६ पासून केंद्र-राज्य प्रमाण ६० : ४० टक्के करण्यात आली आहे.
- घटकनिहाय आर्थिक मापदंड पुढे दिले आहेत.

घटकनिहाय आर्थिक मापदंड

| अ.क्र. | बाब/घटक | खर्चाचे मापदंड |
|---|---|---|
| अ.१ | उपघटक : एकात्मिक शेती पध्दती | |
| १ | फळपीक आधारित शेती पध्दती | निविष्ठा खर्चाच्या ५० टक्के व जास्तीत जास्त रु. २५,०००/- प्रति हे.प्रति लाभार्थी २ हे. च्या मर्यादेत |
| २ | दुग्धोत्पादन आधारित शेती पध्दती | गाय/म्हैस खरेदी, पूरक खाद्य व निविष्ठा खर्चाच्या ५० टक्के व जास्तीत जास्त रु. ४०,०००/- प्रति हे. प्रति लाभार्थी २ हे. च्या मर्यादेत. |
| ३ | पशुधन आधारित शेती पध्दती | पशुधन खरेदी, पुरक खाद्य व निविष्ठा खर्चाच्या ५० टक्के व जास्तीत जास्त रु. २५,०००/- प्रति हे. प्रति लाभार्थी २ हे. च्या मर्यादेत. |
| अ.२ | शेती विकास आणि मुल्यवर्धन | |
| १ | ग्रीनहाऊस ट्युब्युलर टाईप | निविष्ठा खर्चाच्या ५० टक्के रु. ५३०/- प्रति चौ.मी.च्या मर्यादेत व ४००० चौ.मी. प्रति लाभार्थी |
| २ | शेटनेट हाऊस | राऊंड टाईप/फ्लॅट टाईप प्रकारच्या शेडनेटसाठी २०८० चौ.मी.क्षेत्र मर्यादेपर्यंत मंजूर मापदंडानुसार येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के किंवा रु. ३५५/- प्रति चौ.मी. यापैकी जे कमी असेल ते. |
| ३ | मधुमक्षिकापालन | निविष्ठा खर्चाच्या ४० टक्के रु. ८००/- प्रति कॉलनी व ५० कॉलनी प्रति लाभार्थी |
| ४ | मूरघास युनिट | सायलोपीट, चाफकटर व वजनकाटा यासाठी रु. १.२५ लाख मर्यादेत. |
| ५ | काढणीपश्चात व साठवण तंत्रज्ञान | भांडवली खर्चाच्या ५० टक्के व रु. ४०००/- प्रति चौ.मी.व जास्तीत जास्त रु. २.०० लाख/युनिट. |
| अ.३ | गांडुळ खत | |
| १ | पक्के युनिट | खर्चाच्या ५० टक्के व जास्तीत जास्त रु. ५०,०००/- प्रति युनिटच्या मर्यादेत. |
| २ | हिरवळीचे खत | निविष्ठा खर्चाच्या ५० टक्के व जास्तीत जास्त रु. २०००/- प्रति हेक्टरच्या मयांदेत. |

# पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप)

राज्यात पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) हा प्रकल्प सन २००९-१० पासून राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राबविण्यात येत होता. सन २०१३-१४ पासून सदर प्रकल्प नियमित राज्य योजनेंतर्गत राबविण्यात येत आहे. सन २०१७-१८ पर्यंत प्रकल्पाची अंमलबजावणी कृषि पर्यवेक्षक व बाह्यस्त्रोताद्वारे सेवा उपलब्ध करुन घेतलेल्या कीड सर्वेक्षक यांच्याद्वारे करण्यात येत होती. तथापि सन २०१८-१९ पासून भात, कापूस, तूर व हरभरा या पिकासाठी क्रॉपसॅप प्रकल्पाची अंमलबजावणी कीड सर्वेक्षकांच्या ऐवजी कृषि विभागाच्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांद्वारे करण्यात येत आहे. याकरिता राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांनी विकसीत केलेल्या मोबाईल ॲप्लिकेशन व संगणक प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केलेल्या कामगिरीमुळे लोकप्रशासनातील उत्कृष्ट कार्यवाहीबद्दल पंतप्रधान

पारितोषिकासाठी नामांकित करण्यात आले. कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळी व्यवस्थापन कार्यपध्दतीच्या धर्तीवर मक्यावरील नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव विचारात घेऊन मका पिकासह ज्वारी व ऊस पिकांचा तसेच ऊस पिकावरील हुमणी किडीचा क्रॉपसॅपमध्ये समावेश करुन या किडींचे नियमित सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

**प्रमुख उद्देश**

१) प्रमुख पिकांच्या कीड व रोगांचे सर्वेक्षण, सल्ला, व्यवस्थापन करणे.

२) शेतकऱ्यांमध्ये कीड व रोगाबाबत जागरुकता निर्माण करणे.

३) आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांना अनुदानावर कीटकनाशकांचा पुरवठा करणे.

**१. योजनेचे कार्यक्षेत्र : संपूर्ण राज्य**

**२. सर्वेक्षणासाठीच्या प्रमुख किडी व रोग**

**अ) सोयाबीन** : तंबाखूवरील पाने खाणारी अळी, खोडमाशी, उंटअळी, शेंगा पोखरणारी अळी व चक्री भुंगेरा

**ब) कापूस** : तंबाखूवरील पाने खाणारी अळी, तुडतुडे, फुलकिडे, पांढरी माशी, शेंदरी बोंडअळी, अमेरिकन व ठिपक्याची बोंडअळी

**क) भात** : खोडकिडा, गादमाशी, लष्करी अळी, निळे भुंगेरे, तुडतुडे, कडाकरता, जिवाणूजन्य करपा व तपकिरी ठिपके

**ड) तूर** : शेंगा पोखरणारी अळी, शेंगमाशी, पाने व फुले गुंडाळणारी अळी

**इ) हरभरा** : घाटे अळी व मर रोग

**ई) मका** : मक्यावरील नवीन लष्करी अळी (FAW)

**जी)ज्वारी** : मक्यावरील नवीन लष्करी अळी (FAW)

**उ) ऊस** : हुमणी, मक्यावरील नवीन लष्करी अळी (FAW)

**३. क्षेत्र : प्रस्तावित व (प्रत्यक्ष व्याप्त)**

**सोयाबीन** : ३६.०० (४०.४४) लाख हे.

**कापूस** : ३६.०० (४२.५४) लाख हे.

**भात** : १६.०० (१५.५३) लाख हे.

**तूर** : १६.०० (१२.०९) लाख हे.

**हरभरा** : २०.०० (१२.९३) लाख हे.

**एकूण** : १२४.०० (१२३.५२) लाख हे.

**४. सहभागी संस्था**

१) कृषि विभाग, महाराष्ट्र शासन, २) राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन संशोधन केंद्र, नवी दिल्ली, ३) केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर, ४) राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था, हैदराबाद, ५) केंद्रीय कोरडवाहू संशोधन केंद्र, हैदराबाद, ६) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ७) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला, ८) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी, ९) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली, १०) राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पुणे.

**५. कीड रोग सर्वेक्षण व सल्ला कार्यपध्दती**

प्रकल्पाची अंमलबजावणी कृषि विभागाच्या कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येते. कीड–रोगांच्या विविध अवस्थांची कामगंध सापळे व इतर साधनांच्या मदतीने दर सोमवार ते शनिवार प्रत्यक्ष निरीक्षणे मोबाईलद्वारे संगणक प्रणालीमध्ये ऑनलाइन संकेतस्थळावर भरण्यात येतात. संकेतस्थळावरील या निरीक्षणांचे संस्करण राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्याकडून करण्यात येते व राज्यातील संबंधित कृषि विद्यापीठांचे शास्त्रज्ञ सदर संस्करीत तपशिलाचे विश्लेषण करुन दर गुरुवार व सोमवारी ऑनलाइन संकेतस्थळावर तालुकानिहाय उपाययोजना सुचवितात. या उपाययोजनांच्या आधारे शेतकऱ्यांना दूरदर्शन, आकाशवाणी, एसएमएस, वृत्तपत्रे इत्यादी प्रसिध्दी माध्यमांद्वारे मार्गदर्शन करण्यात येते जेणेकरुन त्यानुसार शेतकऱ्यांना वेळच्या वेळी उपाययोजना करुन कीड–रोग नियंत्रण करण्यात येईल.

सदर प्रकल्पात कृषि सहाय्यक हे त्यांच्या मुख्यालय अंतर्गत भात, सोयाबीन, कापूस, तूर आणि हरभरा पिकांचे जास्तीत जास्त क्षेत्र असणारी दोन गावे निवडून तेथील सदर प्रमुख पिकांचे सर्वेक्षण करतात तर कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी हे कृषि सहाय्यकांनी निवडलेल्या गावांच्या व्यतिरिक्त इतर गावातील पिकांचे सर्वेक्षण करतात. त्याचबरोबर, ज्या ठिकाणी कीड–रोगांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या जवळ तसेच त्यावर गेलेला आहे त्या ठिकाणी तालुका कृषि अधिकारी क्षेत्रीय भेटी देऊन त्याची खातरजमा करुन कीड रोग नियंत्रणात ठेवण्याची व्यवस्था करतात.

**६. सर्वेक्षण वेळापत्रक**

१) कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी यांच्यामार्फत सर्वेक्षण व अहवाल नोंदणी ● सोमवार ते शनिवार

२) कृषि विद्यापीठांमार्फत माहितीचे विश्लेषण व सल्ला ● गुरुवार व सोमवार

३) उपविभागीय कृषि अधिकारी यांच्यामार्फत शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे सल्ला वितरण ● गुरुवार व सोमवार.

**७. पीक संरक्षण सल्ले**


संक्षिप्त पीक संरक्षण सल्ला एसएमएसद्वारे शेतकऱ्यांना पाठविणे. सविस्तर पीक संरक्षण सल्ला वार्ताफलक, मोठ्या आकाराच्या झेरॉक्स, वर्तमानपत्र, पत्रकार परिषद व इतर प्रसिध्दी माध्यमांद्वारे प्रसारित करणे.


# महाबीज संशोधीत तूर वाण एम.पी.व्ही.-१०६

महाबीज संशोधीत तूर वाण एम.पी.व्ही.-१०६ हा वाण अधिक उत्पादन क्षमता असणारा, लवकर ते मध्यम पक्वता असणारा, मर व वांझ रोगास मध्यम प्रतिकारक्षम व न तडकणाऱ्या शेंगा ही गुण वैशिष्टे असणारा वाण नुकताच अखिल भारतीय समन्वित तूर प्रकल्प अंतर्गत वार्षिक गट बैठकीमध्ये मान्यता मिळालेला वाण आहे.

## : महाबीज संशोधीत तूर वाण एम.पी.व्ही.-१०६ ची गुणवैशिष्टे :

- इतर प्रचलित वाणापेक्षा अधिक उत्पादन क्षमता
- अधिक शेंगा लागण्याचे प्रमाण, हिरव्या शेंगावरती तपकिरी रंगाचे पट्टे, दाण्यांची संख्या ३-४ दाणे प्रती शेंग
- झाडाची उंची १३५-१५० सें.मी मध्यम वाढणारे वाण
- मध्यम पक्वता कालावधी (१६५-१७४ दिवस )
- १०० दाण्याचे चाचणी वजन हे इतर तुलनात्मक वाणापेक्षा सरस (१०.९७ ग्रॅम)
- खत मात्रेस अधिक प्रतिसाद देणारा वाण
- मर रोगास मध्यम प्रतिकारक्षम तसेच शेंगा पोखरणाऱ्या अळीस प्रतिकारक्षम
- दाण्याचा रंग : तपकिरी
- दाण्याचा आकार : अंडाकृती







## पौष्टिक घटक व पोषण मूल्ये

प्रथिने प्रमाण : 25.87 gm/100 gm

मिथिओनिन : 0.290 gm/100 gm

राखेचे प्रमाण : 2.81 gm/100 gm

उत्तम प्रतीची दाळ व दाळ रिकव्हरी चे प्रमाण 74 टक्के.

## Pigeonpea MPV-106

| | |
|---|---|
| Duration | :- 165-174 days |
| Plant Height | :- 135-150 cm |
| Grain yield | :- 14-15 qtls/hec |
| 100 Seed Weight | :- 10-11 gm |
| 3-4 Grain per Pod | |

Moderately Resistant to Wilt Sterility Mosaic.

# संकरीत पपई रोपांचे आरक्षण सुरु



## रेड लेडी (तैवान-७८६)

## वाणांची रोपे उपलब्ध

महाबीज रोपवाटीकाद्वारे
शास्त्रोक्त पद्धतीने
उत्पादीत जातीवंत उच्च दर्जाचे
संकरीत पपई रेड लेडी (तैवान-७८६)
रोपाचे आरक्षण सुरू आहे. रूपये ६.००/-
प्रति रोप प्रमाणे आरक्षण रक्कम भरुन
नजीकच्या महाबीज जिल्हा कार्यालयात
किंवा महाबीज नर्सरी येथे आरक्षण करावे.

: संपर्क :

महाबीज नर्सरी, शिवणी, अकोला.
०७२४-२२५८२३१/३२, मो.८६६९६४२८००
महाबीज जैव तंत्रज्ञान केंद्र, तेलंगखेडी, नागपूर
०७१२-२५४०१५२ मो.८६६९६४२७४८
महाबीज बिज प्रक्रिया केंद्र, खामगांव,
जि. बुलढाणा मो.८६६९६४२७४२

# महाबीज दर्जेदार बियाणे!



## संकरित वांगे - जयंत

- लागवड हंगाम खरीप, रब्बी व उन्हाळी
- पहिली तोडणी पुर्नलागवडीनंतर ६० ते ६५ दिवसांनी.
- फळांचा आकार रंग चकाकणारा हिरवा व त्यावर हिरवे पट्टे.
- फळाची सरासरी वजन ६० ते ७० ग्रॅम.
- चवीला रुचकर व उत्तम बाजारभाव
- हेक्टरी उत्पादन क्षमता ४०० ते ५०० क्विं.
- सतत व भरपूर फळधारणेची क्षमता.
- वाहतूकीस उपयुक्त
- **इतर उपलब्ध संकरित वाण- यशवंत, अनमोल, सुधारीत वाण -मांजरीगोटा**




## संकरित वांगे - यशवंत

- लागवड हंगाम खरीप, रब्बी व उन्हाळी
- पहिली तोडणी पुर्नलागवडीनंतर ६५ ते ७० दिवसांनी.
- फळांचा आकार रंग चकाकणारा जांभळा व देठाचा रंग हिरवा
- फळाची सरासरी वजन ५० ते ७० ग्रॅम.
- चवीला रुचकर व उत्तम बाजारभाव
- हेक्टरी उत्पादन क्षमता ५०० ते ५५० क्विं.
- सतत व भरपूर फळधारणेची क्षमता.
- भरपूर फळ फांद्या
- **इतर उपलब्ध संकरित वाण- सम्राट, फुले, कृष्णा, फुले, अर्जुन**




## संकरित भेंडी - तन्वी (महाबीज-३३३)

- जोमदार वाढणारे झाड.
- पिकाचा कालावधी १०० ते १२० दिवस.
- पहिली तोडणी लागवडीनंतर ४५ ते ५० दिवसांनी
- मध्यम आकाराचे १० ते १२ सें.मी. लांब फळ.
- फळाचा रंग गर्द हिरवा.
- पिवळ्या शिरीच्या व्हायरस रोगास प्रतिकारक
- दोन फळांमधील अंतर कमी.
- दूरच्या वाहतूकीस उत्तम व टिकाऊ फळे.
- हेक्टरी उत्पादन क्षमता २०० ते २२५ क्विं.
- **उपलब्ध सुधारित वाण : अर्का अनामिका**



## संकरित दुधी भोपळा - ईश्वर (महाबीज -८१०)

- पहिली तोडणी ६५ ते ७० दिवसांनी.
- फळ एकसारखे जाड व आकर्षक फिक्कट हिरव्या रंगाचे
- फळाची लांबी ३० ते ४० सें.मी.
- फळाचे सरासरी वजन ६०० ते ७०० ग्रॅम
- सतत व भरपूर फळधारणेची क्षमता
- हेक्टरी उत्पादन १००० ते १२०० क्विं.
- **इतर उपलब्ध सुधारित वाण - सम्राट**




## संकरित शिरी दोडका - ऐश्वर्या (महाबीज -६०२)

- लागवड हंगाम खरीप, उन्हाळी
- पहिली तोडणी ५५ ते ६० दिवसांनी.
- निमुळते, सडपातळ, मांसल व लांब फळ
- लांबी २५ ते ३० सें.मी.
- फळांचा रंग हिरवा.
- फळांचे वजन १२० ते १४० ग्रॅम.
- भरपूर फळधारणा, अधिक काळ टिकणारे फळ
- हेक्टरी उत्पादन क्षमता ५०० ते ६०० क्विं.
- **इतर उपलब्ध सुधारित वाण - पुसा नसदार**



## संकरित दोडका - दिव्यांका

- जोमदार वाढणारी वेल
- लागवड हंगाम जून ते जुलै व जानेवारी ते फेब्रुवारी
- पहिली तोडणी ४० ते ४५ दिवसांनी.
- सडसडीत व २० ते २५ सें.मी. लांबीची फळे
- फळाचे सरासरी वजन १५० ते २०० ग्रॅम.
- गडद हिरव्या रंगाचे आकर्षक फळ
- भरघोस फळधारणेची क्षमता
- हेक्टरी उत्पादन क्षमता ५०० ते ६०० क्विं.
- **इतर उपलब्ध सुधारित वाण - पुसा चिकनी**



## संकरित वटाणा - महाबीज गोल्ड


- पिकाचा कालावधी ९४ ते १४९ दिवस
- पहिली तोडणी ६० ते ६५ दिवसांनी
- बुटके व न पडणारे वाण, लांब शेंगा
- १०० दाण्याचे वजन १९ ते २० ग्रॅम
- दहिया रोगास प्रतिकारक
- खाण्यास रुचकर
- **इतर उपलब्ध वाण - अर्केल**


महाबीज®

## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

''महाबीज भवन'', कृषी नगर, अकोला - ४४४ १०४. फोन : ०७२४-२४५५०९३ फॅक्स : २४५५१८७.
E-mail : homarketing@mahabeej.com, web.: www.mahabeej.com

महामंडळाचं महाबीज
तुमच्या विश्वासाचं बियाणं



## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

''महाबीज भवन'', कृषी नगर, अकोला - ४४४ १०४. फोन : ०७२४-२४५५०९३. फॅक्स : २४५५१८७.
E-mail : homarketing@mahabeej.com, web.: www.mahabeej.com

महामंडळाचं महाबीज
तुमच्या विश्वासाचं बियाणं

प्रति,

हे त्रैमासिक प्रकाशक श्री अनिल भंडारी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, मर्यादित, अकोला संपादक श्री.एस.एम. पुंडकर, महाव्यवस्थापक उत्पादन यांनी मालक महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला. करिता मुद्रक राजेश्वर प्रिन्टॉन, अकोला. येथे छापून महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, मर्यादित, महाबीज भवन, कृषी नगर, अकोला. येथून प्रसिद्ध केले.